cmyk

## संपादकीय

### आतून हातमिळवणी होणारच..!

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकिचा २० नोव्हेंबरचा मुहुर्त ठरला आहे पण अद्यापी दोन्ही गोटात जागावाटप आणि उमेदवार निश्चिती झालेली नाही. वर वर महायुती विरुद्ध महाआघाडी असा सामना दिसत असला तरी या लढाईचे तपशील ठरतील. आणि करेक्ट कार्यक्रमाचे किंवा सांगली पॅटर्नचे फासे टाकले जातील तेव्हा जे रान उठेल ते वेगळेच असेल. दोन्ही आघाडीवर अनेकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मुख्यमंत्री पदाची अनेकांची इच्छा व इर्षा दडून राहिलेली नाही. ओघानेच अर्जमाघारी नंतर जे चित्र समोर येईल आणि रात्रीच्या अंधारात कोण कुणाचा हात हाती घेईल व कुणाचा कोण करेक्ट कार्यक्रम करेल याचा कुणालाच अंदाज नाही.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### राज्यातील काही भागांत यलो अलर्ट

पुणे: देशातील बहुतांशी भागातून नैऋत्य मान्सूनने माघार घेतली आहे. दरम्यान पश्चिम बंगालच्या उसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. याचा प्रभाव भारतीय दक्षिण द्विपकल्पीय प्रदेशातील राज्यांवर होत आहे. महाराष्ट्रातील काही भागात देखील मध्य ते मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. पुणे हवामान विभागाचे विभागप्रमुख डॉ.के. एस. होसाळीकर यांनी एक्स पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटले आहे की, शुक्रवार संध्याकाळपर्यंत दक्षिण कोकणातील काही भाग, मध्य महाराष्ट्र, गोवा आणि उत्तर कर्नाटक प्रदेशात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय पुढील ४ ते ५ दिवसांत दक्षिण द्वीपकल्पीय भारताच्या काही भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे.

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-१७६ शुक्रवार, दि.१८ ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

# खाद्यतेल, कडधान्य आयातीला आळा घाला!

## शेतकऱ्यांच्या मागणीनंतर कृषी मूल्य व किंमत आयोगाचीही सरकारकडे शिफारस

**दिल्ली । वृतसंस्था**

केंद्र सरकारने खाद्यतेल आणि कडधान्य आयातीला ब्रेक लाववावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. पण झोपेचे सोंग घेतलेल्या केंद्र सरकारला मात्र शेतकऱ्यांची मागणी महत्त्वाची वाटत नाही. आता मात्र कृषी मूल्य व किंमत आयोगाने देखील तेलबिया आणि कडधान्य आयातीला ब्रेक लावण्याची शिफारस केली आहे. भारत एकूण गरजेच्या ६० टक्के खाद्यतेल आयात करतो. त्यामुळे भारताचे खाद्यतेल आयातीवर अवलंबित्व आहे. परंतु खाद्यतेल आयातीचे अवलंबित्व सोयाबीन, सूर्यफूल, मोहरी उत्पादकांची माती करते. खाद्यतेल आयात कमी करण्यासाठी सरकारला तेलबियाच्या लागवडीला प्रोत्साहन द्योवे लागेल. त्यासाठी तेलबिया लागवडी खालील क्षेत्र वाढ आणि उत्पादन सुधारण्यासह तेलबिया उत्पादकांना किफायतशीर दराची हमी देण्याची शिफारस आयोगाने केली आहे. ◀◀ पान २ वर

### तेलबियांच्या उत्पादन वाढीसाठी सरकारने पुढाकार घ्यावा

शेतकऱ्यांना तेलबिया पिके घेण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे असेल तर खुल्या बाजारात तेलबियाचे भाव पडले, तर पुढाकार घेऊन ते खरेदी करावी लागेल. तेव्हाच शेतकरी तेलबिया पिकांना पसंती देतील, असेही निरीक्षण आयोगाने नोंदवले आहे. तसेच केंद्र सरकारने खाद्यतेल उद्योगांना या खरेदीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यावर भर द्यावा आणि बाजारभाव हमीभावाच्या खाली असतील तर तेलबिया पिकांची प्रत्यक्ष खरेदी करण्यापेक्षा भावांतरसारख्या पर्यायाचा अवलंब करावा. बाजारभाव आणि हमीभावातील फरक रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावी, अशी शिफारसही आयोगाने केली आहे. या शिफारशी करताना आयोगाने आयातशुल्क, मागणी पुरवठा आणि स्वस्त दरातील खाद्यतेल आयातीला ब्रेक लावण्याची गरजही व्यक्त केली आहे.

### कडधान्याच्या उत्पादन वाढीसाठी सरकारी खरेदी वाढवा

कडधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करायचे असेल तर उत्तम दर्जाचे बी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यासोबतच २०१५-१६ पासून कडधान्य उत्पादनातील घटीकडे आयोगाने लक्ष वेधले आहे. २०२३-२४ मध्ये ४.८ दशलक्ष टन कडधान्य आयात केल्याची आकडेवारी देत आयोगाने मर्यादित अर्थाने चिंताही व्यक्त केली आहे. वास्तवात केंद्र सरकारने मागील काही वर्ष कडधान्य पिकांच्या आयातीचा सपाटा लावलेला आहे. तूर, मसूर, उडीद आयातीवर भारताचे अवलंबित्व आहे. त्यामुळे या पिकांची उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची शिफारस आयोगाने केली. त्यासाठी कडधान्याची सरकारी खरेदी वाढवण्यावर जोर दिला आहे.

### केवळ हमीभावच नाहीतर धोरणही बदलावे लागेल

आयोगाच्या हमीभावाच्या शिफारशीसोबत हमीभाव व्यतिरिक्त केलेल्या शिफारशी शेती प्रश्नांचा पेच सोडवण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. कारण केवळ कागदावर हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार नाही. तर त्यासोबत ठोस धोरणात्मक निर्णयही केंद्र सरकारला घ्यावे लागतील. अन्यथा एकीकडे शेतकरी हितासाठी हमीभावात वाढ केल्याची शेखी मिरवत दुसरीकडे मात्र शेतकरीविरोधी निर्णयांचा सपाटा लावला तर शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जाते असाच आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे केंद्र सरकारला कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या या शिफारशीवरही लक्ष केंद्रीत करावे लागेल.

### अंतरवालीत इच्छुकांची गर्दी

**जालना । प्रतिनिधी**

अंतरवाली सराटी येथे विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची गुरूवार दि. १७ रोजी बैठक झाली. यावेळी केवळ मते आजमावून पाहण्यात आली. बैठकीत निवडणुकीसंदर्भात काहीही ठरले नाही. अंतीम निर्णय २० तारखेला मराठा समाजासमोर होणार आहे. इच्छुकांची भूमिकाही महत्त्वाची असल्याने यावर चर्चा झाली, असे मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे- पाटील यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषेदत सांगितले.

### भारताचे नवे सरन्यायाधीश न्या.संजीव खन्ना

दिल्ली: सर्वोच्च न्यायालयातील दुसऱ्या क्रमांकाचे ज्येष्ठ न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना हे भारताचे ५१ वे सरन्यायाधीश असतील. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी न्यायमूर्ती खन्ना यांना पुढील सरन्यायाधीश बनवण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. केंद्र सरकारने ही शिफारस मान्य केल्यास न्यायमूर्ती खन्ना १० नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती चंद्रचूड त्याच दिवशी निवृत्त होत आहेत. न्यायमूर्ती खन्ना यांचा कार्यकाळ २३ मे २०२५ पर्यंत असेल. सुमारे साडेसहा महिने ते या पदावर राहणार आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे १९६० रोजी झाला.

# उमेदवार कोणीही असो, खरी टक्कर ओबीसी विरुध्द मराठा

## मतदारांचे अगोदरच ठरवले; पाच मतदार संघातील लढतीकडे लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील ६ मतदार संघात कोणत्या पक्षाचे कोण उमेदवार राहतील याविषयी सर्वांनाच उत्सुकता असून उमेदवार कोणीही असो, मतदारांचे मात्र अगोदरच ठरले आहे. त्यामुळे ओबीसी विरुध्द मराठा उमेदारांमध्येच खरी टक्कर होणार आहे.**

लोकसभा निकालानंतर बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी पुर्णत: विस्कटली असून दोन्ही समुदायांनी विधानसभेला कोणाला तदान करायचे ते त्याच वेळी ठरवले आहे. त्यामुळे कोणत्या पक्षाचा कोण उमेदवार असणार याला फार काही महत्व राहीलेले नाही. लोकसभेला ◀◀ पान २ वर



### माजलगावात प्रस्थापित विरुध्द विस्थापित

माजलगाव मतदार संघात तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याचे संकेत असून मराठा समाजातील आ. प्रकाश सोळंके ंचे पुतणे जसिंह सोळंके, भाजप नेते रमेश आडसकर हे माजी आ. बाबुराव आडसकर यांचे सुपुत्र, माजी आ. बाजीराव जगताप यांचे चिरंजीव मोहन जगताप या तिन प्रस्थापितांविरुध्द ओबीसी नेते व माधव निंळ आणि बाबरी मुंडे यांच्यातच खरा सामना रंगणार आहे. यातील कोण माघार घेतो आणि कोण शेवटपर्यंत लढतो यावर बरच काही अवलंबून असणार आहे.

### गेवराईत प्रस्थापित मराठा नेत्यांपुढे ओबीसी नेते टिकतील का?



गेवराईत दोन पंडीत, एक पवार असे तीन राठा समाजाचे प्रस्थापित नेते निवडणुक लढवणार आहेत. त्यांना टक्कर देण्यासाठी ओबीसी समाजात सक्ष असे चेहरे नसल्याचे दिसून येत असल्याने ओबीसी विरुध्द मराठा असा सामना रंगतदार होईल की नाही? याविषयी तर्क वितर्क लावण्यात येत आहेत. ओबीसीकडून शिवप्रसाद खेडकर, मयुरी खेडकर, पी. टी. चव्हाण, विष्णु देवकते हे इच्छुक आहेत.

### परळीत धनंजय मुंडेंच्या विरोधात नेमका कोण?

परळी मतदार संघात मंत्री धनंज मुंडे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून गुरुवारी त्यांनी परळी मतदार संघातील मतदारांशी पुणे आणि आळंदी येथे संवाद साधला. त्यांच्या विरोधात कोण नेमका कोण असेल हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही. राजेभाऊ फड यांचे नाव मात्र आघाडीवर असून त्यांनाच पवारांकडून पसंती मिळेल असे बोलले जात आहे. या मतदार संघात दोन्ही उमेदवार ओबीसी असल्यावर मराठा समाज नेमकी का भुमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






### बीडमध्ये ओबीसी-मराठा समाजातील इच्छुक समान

या मतदार संघात ओबीसी नेते जयदत्त क्षीरसागर, आ. संदिप क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर हे इच्छुक असून मराठा समाजाकडून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे, कुंडलिक खांडे, बी. बी. जाधव हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या सर्वांनी जोरदार तयारी केली आहे. ओबीसी आणि मराठा समाजातील इच्छुकांची संख्या मात्र समान असल्याने बीडमध्ये चुरशीच्या लढती होणार आहेत.



### आष्टीत धोंडे सर्वांचेच गणित बिघडवणार?

या मतदार संघातून आ. ाळासाहे आजबे यांना उमेदवार मिळेल की नाही ? याविषयी अजूनही स्पष्ट झालेले नाही. मात्र आ. यांनी धोंडे यांच्याविषयी मवाळ भुमिका घेतली असून माजी मंत्री सुरेश धस यांची पंचाईत केली आहे. आष्टीत सुध्दा मराठा आणि ओबीसी अशीच लढत होणार असल्याचे बोलले जात आहे.



### केजमध्ये आ. मुंदडांच्या विरोधातील उमेदवार ठरेना

**केज मतदार संघात आ. नमिता मुंदडा यांच्या विरोधातील उमेदवार अजून ठरलेला नसल्याने मुंदडा यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. शरद पवार गटाकडून माजी आ. पृथ्वीराज साठे, संगिताताई ठोंबरे, अंजली घाडगे यांचे नावे चर्चेत आहेत. हा मतदार संघ राखीव असला खरी लढत ही मराठा विरुध्द ओबीसी अशीच असणार आहे.**

# तिसऱ्या आघाडीकडून १५० जागांची घोषणा

## परिवर्तन महाशक्तीचे छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गुरूवारी परिवर्तन महाशक्तीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. बैठकीत १५० जागाबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच इतर जागांवरचा निर्णय देखील घेण्यात येणार आहे. बरेच लोक आमच्याकडे येण्यास इच्छुक असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी यावेळी दिली. एकनाथ शिंदे असो की देवेंद्र फडणीस यांच्या विरोधात देखील उमेदवार देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मनोज जरांगे पाटील यांच्याशी देखील आमचे बोलणे सुरु आहे. ते आमच्या सोबत येतील असे प्रयत्न सुरु असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली. तसेच महादेव जानकर देखील आमच्यासोबत येतील असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला आहे. स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार आम्ही या निवडणुकीत देणार असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. आमच्याकडे छोट्या मोठ्या ३० ते ४० संघटना असल्याचे राजू शेट्टी ◀◀ पान २ वर



# चाटगाव येथे ओबीसी मेळाव्याचे आयोजन

## प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती

**दिंद्रुड प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यातील चाटगाव येथे भव्य ओबीसी मेळाव्याचे आयोजन ओबीसी बचाव आंदोलनाचे प्रणेते प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, माधव निर्मळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी करण्यात आले आहे या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन चाटगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.**

ओबीसी समाजासाठी अहोरात्र तळमळीने झटणारे प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे सह माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ओबीसी नेते माधव निर्मळ यांच्या प्रमुख उपस्थितीत चाटगाव येथे शुक्रवारी सायंकाळी



५ वाजता भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात ओबीसी समाजाच्या आरक्षण मुद्द्यावर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक संतोष केकान यांनी माध्यमांना दिली आहे. या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चाटगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.


### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | २,४२१ | २,५४० | २,४८७ |
| ज्वारी/हायब्रिड :४२.५० क्विंटल | १,६२५ | २,७११ | २,१८१ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :२०.०० क्विंटल | ५,२०० | ७,६०० | ६,७३४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५०१ | २,५०० |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६९० | ७,१०० | ६,९६४ |
| सोयाबीन: ७५३.०० क्विंटल | ३,००० | ४,४०० | ४,०२९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

# माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव



## जनतेचा आशीर्वाद आहे तोवर मी कुणाला घाबरत नाही-धनंजय मुंडे

**पुणे । पतिनिधी**

**मी ज्याच्यासोबत आहे त्याच्यासोबत इमानदारी दाखवली म्हणून माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव आखला जातं आहे, माझ्या नशिबात संघर्ष पाचवीला पुजला आहे, त्यामुळे तुमच्या सहकार्याने आणि आशीर्वादाने मी कोणाला घाबरत नाही, तुम्ही साथ द्या, मी तुमच्यासोबत कायम राहील असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पुणे येथे बोलताना केले.**

पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विद्यार्थी संवाद मेळाव्यात मुंडे बोलत होते. बीड जिल्ह्यातील आणि परळी मतदार संघातील विद्यार्थ्यांशी यावेळी मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, या मेळाव्याला पंकजाताई मुंडे देखील येणार होत्या, पण त्या दिल्लीत आहेत, त्यांनी माझ्याजवळ शुभेच्छा संदेश दिला आहे. मी पुण्यात शिकलो असं सांगत मुंडे यांनी पुण्याचं अन माझं एक वेगळं नातं आहे असं म्हटलं. यावेळी कॉलेज जीवनातील आणि मित्रांसोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी मी नेता नसून तुमचा देखील मित्रच आहे, असे समजा म्हणत उपस्थित तरुणांना साद दिली. माझ्या राजकीय प्रवासात मी अनेक संघर्ष पाहिले. रोज नव्या आव्हानांना तोंड देत मी इथपर्यंत पोहचलो आहे. राजकीय वाटचालीत मला अजितदादा पवार यांनी जी साथ दिली ती कधीही न विसरता येणारी आहे. मी दीड वर्षांपूर्वी त्यांच्यासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून काही लोक मला संपवण्याची भाषा करू लागले आहेत. माझ्यावर खालच्या पातळीला जाऊन आरोप केले जातं आहेत, माझी जात, माझ्या कुटुंबाचे नाव अगदी ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# आतून हातमिळवणी होणारच... !

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकिचा २० नोव्हेंबरचा मुहूर्त ठरला आहे पण अद्यापी दोन्ही गोटात जागावाटप आणि उमेदवार निश्चिती झालेली नाही. वर वर महायुती विरुद्ध महाआघाडी असा सामना दिसत असला तरी या लढाईचे तपशील ठरतील. आणि करेक्ट कार्यक्रमाचे किंवा सांगली पॅटर्नचे फासे टाकले जातील तेव्हा जे रान उठेल ते वेगळेच असेल. दोन्ही आघाडीवर अनेकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मुख्यमंत्री पदाची अनेकांची इच्छा व इर्षा दडून राहिलेली नाही. ओघानेच अर्जमाघारी नंतर जे चित्र समोर येईल आणि रात्रीच्या अंधारात कोण कुणाचा हात हाती घेईल व कुणाचा कोण करेक्ट कार्यक्रम करेल याचा कुणालाच अंदाज नाही. या निवडणुकीत राजकीय विश्वासार्हता जशी अडचणीत आहे तसा जातीय सलोखाही संकटात आहे. मराठा नेते मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचा सुफडा साफ करा असा फतवा जारी केला आहे. जरांगेची आरक्षण मागणी मराठा समाजाची आणि कार्यक्रम शरद पवारांचा आहे हे राजकारण लपून राहिलेले नाही. त्यातच ‘मराठ्यांचा नाथ एकनाथ’ अशी घोषणा एकनाथ शिंदेच्या शिवसेनेकडून दिली जाते आहे. त्यामुळे मतपेटीतून बाहेर काय येते हे बघणे उत्कंठावर्धक ठरेल यात शंका नाही.

दसऱ्याचा मुहूर्त साधून राजकीय पक्ष व नेत्यांनी आपली शक्ती दाखवली आणि निवडणुकीत आपली भूमिका काय असणार यांचा अंदाज दिला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला फटका बसल्याने महाआघाडी आपण जिंकलोच या भावात वावरते आहे. महाआघाडीत कोण मोठा भाऊ आणि मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण यावरुन धुसफूस सुरु झाली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद उद्धव ठाकरे यांना हवे आहे. काँग्रेसमध्ये अनेकांनी त्यासाठी देव पाण्यात कोंडून ठेवले आहेत. तर शरद पवार आम्ही त्या शर्यतीत नाही असे सतत सांगू लागले आहेत. त्यामुळे काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट सावध झाला आहे. शरद पवार यावेळी कुणाचा कार्यक्रम करतात, याबद्दलही विविध तर्क आहेत पण काँग्रेसला शरद पवारांच्या विश्वासाहर्ततेचा आणि महाराष्ट्रातील पृथ्वीराज चव्हाण सरकार पाडल्याचा अनुभव आहे. दिल्लीतून उद्धव ठाकरे यांचा चेहरा पसंत आहे अशी हुल उठली आहे. मातोश्रीतील बंद खोलीतील अमित शहाचे ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन या स्वरुपातील ती आहे का हे वेळ आली तर कालांतराने कळेल पण सारे ऑलवेल नाही.

महायुती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक मैदानात उतरणार असली तरी महायुतीत मोठा भाऊ ही भूमिका भाजपाकडेच राहणार आहे. मराठा समाजाला दहा टक्के स्वतंत्र आरक्षण आणि अन्य गोष्टी देऊ करुनही मराठा समाज खुश नाही. लोकसभा निवडणुकीत मराठा, मुस्लिम आणि मागासवर्गीय अशी आघाडी होऊन महाआघाडीला राज्यात अधिक जागा मिळाल्या. या साऱ्या पार्श्वभूमीवर काश्मीर आणि हरियाणा निवडणुकीत जे निकाल आले ते राज्यात दिशादर्शक ठरलेले आहेत. महायुतीने ओबीसी आणि महिला कार्ड अधिक मजबूत करण्यावर आणि महिला मते मिळवण्यावर भर दिला आहे. मागासवर्ग संविधान आणि आरक्षण धोक्यात या अपप्रचाराने लोकसभेच्यावेळी बिथरला होता, त्यालाही विश्वासात घेतले जाते आहे. ओबीसीत काही नवीन घटकांचा समावेश, ओबीसीच्या विविध घटकांचे मेळावे, त्यांच्यासाठी महामंडळे आदी पावले महायुतीने उचललीच पण गेल्या महिन्याभरात राज्याने आपली अवघी तिजोरी रिक्त करत सर्वांना खुश करण्याचे धोरण अवलंबिले. मराठीला राज भाषेचा दर्जा, शेतकऱ्यांना पिकविमा व नुकसान भरपाई अथवा वाढीव हमीभावाने धान्य, सोयाबीन खरेदी असे अनेक निर्णय केले. लाडकी बहिण योजनेचे पैसे महिलांच्या खात्यात जमा झाले. महिलांना अर्ध्या खर्चात प्रवास, याचबरोबर मुंबईत टोलमाफी, शेतकऱ्यांना वीजबिल माफी, मनपा कामगारांना घसघशीत बोनस, मेट्रो, रेल्वे यांच्या विविध सुविधा, तीर्थयात्रा योजना, महाराष्ट्रात नवीन दहा मेडिकल कॉलेज. नवे वाढवण बंदर असा घोषणांचा पाऊस नव्हे ढगफुटीच केली आणि महाराष्ट्राची निवडणूक प्रतिष्ठेची करत अमित शहांनी निवडणुकीची महायुतीची सुत्रे स्वत: कडे घेतली. एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांना सोबत घेताना भाजप मोठा भाऊ, भाजप कार्यकर्त्यांनी त्याग केल्याने शिंदेंना मुख्यमंत्रीपद मिळाले वगैरे सांगत त्यांनी महायुतीला ठिकाणावर आणले व निवडणूक भाजपाच्या हातातून गेली म्हणणारे आता चूरस भरली म्हणू लागले आहेत. जागावाटप आणि उमेदवार निश्चिती वेळ खाणार आहे. वर वर दोन तंबू दिसत असले तरी आतून हातमिळवणी होणारच आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी विविधरंगी लढती आणि अनपेक्षीत निकाल येणार हे सुस्पष्ट आहे. अपक्ष, बंडखोर आणि तिसरी परिवर्तन महाआघाडी, मनसे, आप, एमआयएम असे भिडू बऱ्या संख्येने निवडून आले तर मतमोजणीनंतर घोडेबाजार भरणार आणि जो तो खुर्चीला बांधील राहणार. ओघानेच बंद खोलीत काहीही ठरले तरी मैदानात कोण बाजी मारणार हे महत्त्वाचे आहे. त्यानंतरच चेहरा ठरेल आणि प्रत्येकजण वर्ष-सहा महिने असा काळ ठरवून सत्तेत येतील.

शरद पवारांनी ठिकठिकाणी मातब्बर मराठे पक्षात घेऊन तिकीट जाहीर करायला सुरुवात केली आहे. इंदापूरमध्ये त्याला निष्ठावंतांचा विरोध झाला आहे. पण निवडून येणारा उमेदवार हाच निकष महत्त्वाचा ठरतो. जातदांडगा, धनदांडगा हे निकष राहतातच, जरांगेंची साफसुफडा घोषणा काय काम करते हे बघावे लागेल. निवडणुकीपूर्वी वा नंतर निरनिराळी समीकरणे पुढे येऊ शकतात. राजकारण जोरदार आकारेल पण महाराष्ट्रहित, लोकहित यांचे भवितव्य काय होईल हे सांगता येत नाही. मतदार शहाणा असतो तो कोणाला आणि काय मुद्दा समोर ठेऊन मतदान करतो हे पहावे लागेल.



## सोमनाथराव बडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**वडवणी । प्रतिनिधी**

मकरध्वज शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य सोमनाथराव बडे यांची छत्रपती संभाजीनगर विभागीय शिक्षण बोर्डाच्या सदस्य पदी आज निवड करण्यात आली. या पुर्वी २००३ मध्ये बडे सरांनी या पदावर काम करत असताना आपला दबदबा निर्माण करत मंडळा अंतर्गत असणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शिस्त लावण्याचे काम केले, त्यांच्या काळामध्ये अनेक शैक्षणिक धोरणात्मक निर्णय झाले, त्यांच्या कामाचे स्वरूप पाहून परत त्यांना दुसऱ्यांदा या पदावर काम करण्याची संधी मिळाली आहे.बडे सरांची बोर्ड मेंबर पदी निवड होताच त्यांना वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यातून हितचिंतकानी शुभेच्छांचा वर्षाव केला, तर सायंकाळी गोरक्षनाथ विद्यालयाचे प्रा. अनिल कांबळे प्रा. दशरथ गीते ,प्रा. एम.आर. वाघमारे ,प्रा. विनोद जोशी यांनी निवासस्थानी जाऊन सरांचा हहय सत्कार केला, यावेळी मकरध्वज शिक्षण संस्थेचे सहसचिव संजयबाप्पा बडे, चिंचवणचे उपसरपंच मयूर बडे , तुकाराम गवळी आदी उपस्थित होते.

# कलम ६ अ ची वैधता कायम!

## सीएएबाबत सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

**दिल्ली । वृतसंस्था**

**नागरिकत्व सुधाणा कायद्याबाबत गुरूवारी (दि.१७ ) सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने आपला निकाल दिला. सरन्यायाधीशांसह न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती एमएम सुंदरेश, आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या घटनापीठाने सीएएतील कलम ६ अ ची वैधता कायम ठेवली आहे. तर न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला यांनी असहमती दर्शवली.**

सर्वोच्च न्यायालयाने ४:१ च्या बहुमताने १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये प्रवेश केलेल्या स्थलांतरितांना नागरिकत्व देणारा नागरिकत्व कायदा, १९५५ च्या कलम ६ अ ची घटनात्मक वैधता कायम ठेवली आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी स्पष्ट केले की, बांगलादेशच्या निर्मितीनंतर बेकायदेशीर स्थलांतराच्या समस्येवर आसाम करार हा एक राजकीय उपाय होता. तर कलम ६ अ हा कायदेशीर उपाय होता. बहुसंख्य निकालाने असेही मानले की २५ मार्च १९७१ ही कट ऑफ तारीख तर्कसंगत होती, कारण ती तारीख होती जेव्हा बांगलादेश मुक्तिसंग्राम संपला होता.

**जगा आणि जगू द्या आमचे तत्वज्ञान – न्यायमूर्ती सूर्यकांत**

१९८५ मध्ये आसाम करारामध्ये नागरिकत्व कायद्याचे कलम ६ जोडण्यात आले होते. या कायद्यानुसार १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये आलेले बांगलादेशी स्थलांतरित भारतीय नागरिक म्हणून आपली नोंदणी करू शकतात. तथापि, २५ मार्च १९७१ नंतर आसाममध्ये येणारे परदेशी भारतीय नागरिकत्वासाठी पात्र नाहीत. या कायद्यावर न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले – आम्ही कलम ६ अ ची घटनात्मक वैधता कायम ठेवली आहे. आम्ही कोणालाही शेजारी निवडण्याची परवानगी देऊ शकत नाही आणि ते बंधुतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. जगा आणि जगू द्या हे आमचे तत्वज्ञान आहे. आसाममधील ४० लाख स्थलांतरितांचा प्रभाव पश्चिम बंगालमधील ५७ लाख स्थलांतरितांपेक्षा जास्त आहे कारण आसाममधील जमीन पश्चिम बंगालच्या तुलनेत खूपच कमी आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

**न्यायमूर्ती पार्डीवाला ६ अ च्या वैधतेबाबत असहमत**

घटनापीठातील न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला यांनी सीएएतील कलम ६ अ च्या वैधतेबाबत असहमती दर्शवली. कलम ६ अ ने काळाच्या ओघात असंवैधानिकता प्राप्त केली आहे, असे मत त्यांनी नोंदवले. न्यायमूर्ती पार्डीवाला म्हणाले की, १९७१ च्या आधी प्रवेश केलेल्या कोणत्याही व्यक्तीला कायदेमंडळ नागरिकत्व देऊ शकते आणि राज्यातील आगामी निवडणुका लक्षात घेऊन १९६६ ते १९७१ या कालावधीत वैधानिक श्रेणी तयार करणे आवश्यक आहे. १९६६ ते १९७१ पर्यंत कठोर अटी (१० वर्षे मतदानाचा हक्क नाही) च्या अधीन एक वैधानिक श्रेणी तयार करण्यात आली होती याचा अर्थ असा होतो की, नागरिकत्व बहाल करणे हे खरे तर आसामच्या लोकांना शांत करण्यासाठी होते की अशा समावेशाचा आगामी काळात परिणाम होणार नाही. राज्यात निवडणुका आहेत, असे ते म्हणाले.

## ‘आप’ चा मोठा निर्णय : महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणूकीतून माघार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**आम आदमी पक्ष महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याचे समजते. फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सत्ता असलेल्या दिल्लीत लक्ष केंद्रित करण्यावर आम आदमी पक्षाचा भर आहे. तसेच नुकत्याच पार पडलेल्या हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला अपेक्षित यश संपादन करता आले नाही. जम्मू-काश्मीरमध्ये केवळ एक जागा मिळाली. यामुळे हा निर्णय घेण्यात येत असल्याचे समोरय येत आहे. दरम्यान, आम आदमी पक्षाच्या या निर्णयाने महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मात्र बळ मिळणार आहे.**

आपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनूसार, महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये इंडिया आघाडीतील मत विभाजन टाळावे, एकजुटीने निवडणुकीला सामोरे जावे, हाही आम आदमी पक्षाचा उद्देश आहे. असे केल्यास दिल्ली विधानसभा निवडणुकीवेळी इंडिया आघाडीतील घटकपक्ष ताकदीने सोबत राहतील, असेही आपला वाटते. मागील विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आम आदमी पक्षाने २४ विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली होती. त्यापैकी २३ उमेदवारांची अमानत रक्कमही गमभावी लागली होती.

## पान १वरून...

### खाद्यतेल, कडधान्य

केंद्र सरकार दरवर्षी हमीभाव जाहीर करते आणि त्यानंतर कोणत्या पिकांच्या हमीभावात किती वाढ केली, यावर सर्वाधिक चर्चा केली जाते. केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोग हमीभावाची जशी शिफारस करतो, तशीच हमीभाव वगळता इतर काही शिफारशी करतो. या शिफारशीना नॉन-प्राइस रिकंमेडशन असे म्हणतात. परंतु या शिफारशीवर चर्चा होत नाही. केंद्रिय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडून हमीभाव व्यतिरिक्त शेतीकर्ज, कृषी संशोधन, वीज पुरवठा, सिंचन आणि संशोधनाबद्दलच्या महत्त्वाच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. परंतु कडधान्य आणि खाद्यतेल आयातीकडे दोन महत्त्वाच्या शिफारशीच्या निमित्ताने सरकारचे लक्ष वेधले आहे. २०२२-२३ मध्ये मोहरीचे बाजारभाव हमीभावाच्या वर होते. परंतु २०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन वर्षात बाजारभाव हमीभावाच्या खाली राहिले. तर करडईचे दर मागच्या पाच वर्षात बाजारभाव हमीभावाच्या खालीच आहेत.

------------

### उमेदवार कोणीही असो, खरी टक्कर

पंकजा मुंडेंना मतदान करायचेच नाही, अशी भुमिका त्यावेळी बहुतांश मराठा समाजाने घेतली होती. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा पराभव सुध्दा झाला. त्यानंतर ओबीसी समाजानेही विधानसभा निवडणुकीत फक्त ओबीसी उमेदवारालाच मतदान करायचे अशी भुमिका घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे उमेदवार कोण याचा मतदार जास्त महत्व देतील, असे वाटत नाही. ज्या मतदार संघात महायुती आणि मविआचे उमेदवार मराठा समाजातील असतील त्या ठिकाणी ओबीसी समाजातील किती मतदार त्यांच्याकडे झुकेल, याबद्दल संभ्र आहे. तर ज्या मतदार संघात दोन्ही उमेदवार ओबीसी असतील तिथे मराठा समाज त्या उमेदवारांच्या पाठीशी राहील की नाही हे स्पष्टपणे सांगता येत नाही. प्रत्येक मतदार संघात आपल्याच उमेदवाराला मते दिली जातील, असे म्हटले जात असून खरी लढत ही पाचही मतदार संघात ओबीसी विरुध्द मराठा अशीच पहायला मिळण्याची शक्यता आहे.

--------

### तिसऱ्या आघाडीकडून १५०

म्हणाले. सामान्य माणसाला आपले वाटेल असे सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न करु असे बच्चू कडू म्हणाले. आम्ही चांगले उमेदवार देणार असल्याचे कडू म्हणाले. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसले परिवर्तन आणणार आहात? असा सवालही कडू यांनी केला. तुम्ही इतके दिवस सत्तेत होता, मग आता कसे काय परिवर्तन तुम्ही करणार? असे ते म्हणाले. परिवर्तनाचा अधिकारी युतीलाही नाही आणि आघाडीलाही नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला असल्याचे कडू म्हणाले. नवीन परिवर्तन हे खऱ्या अर्थाने कामाचे असेल, बजेटमधील हिस्सा हा सामान्य माणसाचा असल्याचेही आ.कडू म्हणाले.

**मनोज जरांगे यांच्याशी बोलणे झाले – संभाजी राजे**

यावेळी छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, प्रस्थिपीत लोकांच्या विरोधात लढा देणारे उमेदवार आम्ही देणार आहोत. सोबतच मनोज जरांगे पाटील यांच्याशी माझे बोलणे झाले आहे. पण त्यांनी अद्याप निर्णय घेतला नाही. त्यांनी आमच्यासोबत यावे अशी आमची भूमिका असल्याचे संभाजीराजे यावेळी म्हणाले.

------------

### माझं राजकीय अस्तित्व

माझी लायकी काढली जात आहे. एवढ्या मोठ्या माणसांनी असं बोलण योग्य नाही. पण मी कोणाला भीत नाही, घाबरत नाही. कारण तुमचा अन परळीकरांचा आशीर्वाद सोबत आहे. पुढच्या काळात बीड जिल्ह्याला विचारात घेतल्याशिवाय राज्याचं राजकारण पूर्ण होणार नाही. स्व. मुंडे साहेबांनी जिल्ह्याचे नाव देशात केलं, त्यांच्याच आशीर्वादाने मी माझ्या पद्धतीने जिल्ह्याचे नाव मोठं करण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही सोबत रहा अन आशीर्वाद द्या असं म्हणत मुंडे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी बालगंधर्व रंगमंदिर तरुणाईने हाऊसफुल्ल झालेले पाहायला मिळाले. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, समीर चांदेरे, अजय मुंडे, महादेव डोईफोडे, राजपाल लोमटे, विठ्ठल सानप, अविनाश नाईकवाडे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

------------

## पान ६ वरून...

### निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या

पालन करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व परवानगी संपल्यानंतर ते दूर नष्ट करून इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

**मतपत्रिका छपाई**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

**यावरही असतील निर्बंध**

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इ. करण्यावर तसेच जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध असतील.

**प्रचार वाहनांवरील झेंडा, कापडी फलक**

प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. वाहनावर लावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

**ध्वनीक्षेपकाचा वापर**

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधित घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

**रहदारीस अडथळा नको**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस्, कटआऊटस, होर्डिग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

**खासगी व्यक्तीच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध**

निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीच्या संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत, असेही नमूद आहे.

-----------

### वयाच्या ८५ व्या.वर्षी श्रीमती रंगुबाई

त्यांना सदिच्छा देत आहेत. रंगुबाई बोडखे यांनी काल कोजागिरी पौर्णिमेच्यानिमित्ताने आपल्या माहेरच्या गावी जाऊन तेथील भोन्याई या देवीची पूजा अत्यंत मनोभावे केली.इतक्या वृद्ध अवस्थेत सुद्धा ईश्वरावर श्रद्धा असल्यानंतर मनुष्य अत्यंत श्रद्धा भावभक्तीने देवाच्या चरणी नतमस्तक होऊन आनंदी आणि समाधानाची जीवन जगू शकतो हे यानिमित्ताने श्रीमती रंगुबाई बोडखे यांच्या या अध्यात्म निष्ठेने आधोरेखीत केले आहे.

-----------

### महात्मा गांधी सेवाभाव व समर्पित

थारकर, प्रा. मेजर एस. पी. कुलकर्णी, हेमंत धानोरकर, गणेश कदम, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.शैलजा बरुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे श्री. राहुल घाडगे, सारंग भगत, आदित्य कासारे, सिद्धेश्वर मोरे,नेहा बोंडगे, मोनिका मिसाळ, ऋतुजा शिंदे , संकेत पवार, श्रीराम वाशिंबे , अविष्कार जंगले, प्रथमेश उपाडे, वैष्णवी खाडे, विकास कांदे, ज्ञानेश्वर नवघरे या विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

-----------

### गंगा माऊली चे बॉयलर

राहुल सोनवणे, अविनाश मोरे, प्रविण मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला यावेळी विखे पाटील साखर कारखान्याचे चेअरमन नवनाथ थोटे यांचे हस्ते सपत्नीक बॉयलर पूजन करण्यात आले. यावेळी आदित्य पाटील यांनी देखील बोलताना सांगितले की, कारखान्याच्या बाबतीत खा. रजनीताई व अशोक पाटील यांनी जे स्वप्न पाहिले होते ते आज कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांच्या प्रयत्नाने सत्यात उतरत आहे याचा मनस्वी आनंद आम्हाला आहे यापुढे देखील आम्ही हा कारखाना शेतकरी, ऊसतोड मजूर व कर्मचारी यांच्या हितासाठी कटिबध्द असून कायम ही नाळ जोपासली जाईल अस मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रंगी राहुल सोनवणे, राजेसाहेब देशमुख यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाला बाबाराजे देशमुख, प्रकाश भन्साळी, प्रविणकुमार शेप, पशुपतिनाथ दांगट यांचे सह ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे सर्व संचालक मंडळ, कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुजावर, मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक यांचे सह सर्व विभागाचे प्रमुख, व कर्मचारी उपस्थीत होते.

-------------

### काकू-नाना प्रतिष्ठानला गोरगरिबांच्या

क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय सलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व द्वारा फिरता दवाखाना मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचा उपक्रम गेली ९० दिवसांपासून नियमितपणे राबवले जात आहे. हे शिबिर काकू-नाना प्रतिष्ठानचे सचिव तथा सल्लागार डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पांगरकर यांचे मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान यांच्या समन्वयाने यशस्वी राबवले.

--------------

### कृ.उ.बा.समिती अंबाजोगाई चे सभापती

आमचे लक्ष आहे मोठे व्यापारी संकुल तयार करून शेतकरी भवन उभारणार ही महाराष्ट्रातील पहिली एकमेव बाजार समिती असेल ज्याला पायलेट प्रोजेक्टच्या माध्यमातून एक कोटी ५७ लक्ष रुपये मिळाले आहे त्यातून शेतकऱ्यांच्या आरामासाठी सहा रूम व एक मोठा हॉल तयार करण्याचे आयोजन आहे गरीब गरजू शेतकऱ्यांसाठी व त्यांच्या शुभकार्यासाठी बाजार समितीच्या वतीने आयोजन करण्यात आलेले आहे असे बोलताना बाजार समितीचे सभापती एडवोकेट राजेश्वर आबा चव्हाण हे म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे रणजीत चाचा लोमटे अजित दादा गरड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांचा सत्कार करण्यासाठी जेष्ठ संचालक दत्ता आबा पाटील ,विलास सोनवणे,ताराचंद शिंदे,बालासाहेब सोळंके ,शिवाजी सोमवंशी, रामलिंग चव्हाण ,गौतम चाठे, चिमु पाटील बाळासाहेब देशमुख, सत्यजित शिरसाठ ,तानबा लांडगे ,सुचित्रा देशमुख ,सरस्वती आगळे, पुरुषोत्तम भन्साळी ,भूषण ठोंबरे ,जलाल गवळी ,यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव दिनकर नांदुरकर प्रभाकर काळे प्रमोद देशमुख बाळासाहेब व सर्व कर्मचारी शेतकरी शेतमजूर व्यापारी हमाल मापारी यांच्यासह अनेक जण उपस्थित राहून सभापती श्री राजेश्वर आबा चव्हाण यांचा सत्कार केला.

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय घनसावंगी

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७२१८६ फॅक्स क्रमांक:-
E-Mail ID:-tahghan@gmail. संकेतस्थळ:
जा.क्र.२०२४/एमएजी/कावी-९३३ दिनांक:-०९/०९/२०२४

वाचा:- १.जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम - २०२३, २. श्री./श्रीमती तारामती संतोष बेदरे रा.अंतरवाली टेंभी ता.घनसावंगी जि.जालना यांनी त्यांचे मुले गणेश, संतोष बेदरे, संध्या संतोष बेदरे, स्नेहा संतोष बेदरे यांचा अर्ज दि.०९.०९.२०२४, ३. या कार्यालयाची तजवीज दिनांक ०९/०९/२०२४

**जाहीर प्रगटन**

**कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व जनता मौजे अंतरवाली टेंभी ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री./श्रीमती/कु.तारामती संतोष बेदरे रा.अंतरवाली टेंभी ता.घनसावंगी जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन त्यांनी त्यांचा/त्यांची/मुले नामे १.गणेश संतोष बेदरे, २.संध्या संतोष बेदरे,३. स्नेहा संतोष बेदरे यांचा / हिच्या जन्म अनुक्रमे दि.०६/०६/२००१, दि. ०७/१२/२००५, दि.०६/०८/२००३ ही दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/ आक्षेप/ आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०९/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तालुका दंडाधिकारी**
**घनसावंगी.**

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४


## अंजनवती हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था संचलित अंजनवती हायस्कूल अंजनवती येथे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती, माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, माजी खा. केशरबाई काकू क्षीरसागर, स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी शाळेतील सहशिक्षक वाघ व सर्वज्ञ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक शिरीष घरत यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वाचन करणे हीच खरी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली आहे असे ते म्हणाले. सूत्रसंचालन वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन खोसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक निर्मळ, मिटकरी,येडे, लक्ष्मण बोराटे, आबा भड यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात



### गणवेशाविषयी उर्दू शिक्षक संघटनाचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

बीड : विद्यार्थ्यांच्या गणवेशाविषयी मागणी करणारे निवेदन देऊन, उर्दू माध्यमाच्या १३ शिक्षकांना दर्जावाढ आणि नवनियुक्त शिक्षण सेवकांना नियुक्ती आदेश दिल्याबद्दल प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांचे अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प.) बीड ने आभार व्यक्त केले.

याविषयी संघटनेने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शासनाने सुरु केलेल्या मोफत गणवेश योजना २४-२५ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश किंवा गणवेशासाठी कापड देण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यम व मराठी माध्यमातील अल्पसंख्यांक समुदायातील मुस्लीम मुलींसाठी कमीज-सलवार व दुपट्टा तसेच मुलांसाठी हाफ पॅन्ट व हाफ शर्ट ऐवजी फुल पॅन्ट व फूल शर्ट द्यावा किंवा त्यासाठी लागणारे कापड उपलब्ध करुन देण्यात यावे. अशी मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प.) बीड ने दिलेल्या निवेदनातून केली आहे. तसेच उर्दु माध्यमाच्या १३ शिक्षकांना दर्जावाढ दिल्याबद्दल आणि पवित्र पोर्टल द्वारा उर्दू माध्यमाच्या १९ प्राथमिक पदवीधर नवनियुक्त शिक्षण सेवकांना नियुक्ती आदेश देण्यात आले. म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांचा संघटनाच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी बीडचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी पठाण समुंदर खान, मुहम्मद ईसाक, संघटनेचे जिल्हाध्यक्ष काझी मुशाहेद, कार्याध्यक्ष उस्मान खान, मोमीन जावेद, शेख इम्रान आदी उपस्थित होते.

### महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार घालून जयंती साजरी करण्यात आली

कर्मचारी प्रतिनिधी डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना म्हणाल्या की,रामायण या महाकाव्याची रचना महर्षी वाल्मिकी ऋषी यांनी केली.ते एक महान लेखक होते. वाल्मिक यांचा जन्म अश्विन महिन्याच्या पोर्णिमेच्या दिवशी झाला होता.या दिवसाला हिंदू धार्मिक दिनदर्शिकेत वाल्मिकी जयंती म्हणतात.या वर्षी वाल्मिकी जयंती १७ ऑक्टोंबर रोजी साजरी करतात.महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनातून खूप काही शिकण्यासारखे आहे. त्यांचे व्यक्तिमत्व सामान्य नव्हते. त्यांच्या आयुष्यातील एका घटनेने प्रेरित होऊन त्यांनी आपल्या जीवनाचा मार्ग बदलला.त्यांनी महान ग्रंथ रामायणाची संस्कृत भाषेत निर्मिती केली असे यावेळी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.बळीराम राख यांनी केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,प्राचार्य ,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर आदीसह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# तुळजाभवानीच्या यात्रेत ओढल्या बैलगाड्या, यात्रेला भाविकाची गर्दी

माळेगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील माळेगाव येथे ग्रामदैवत तुळजाभवानी मातेची कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी यात्रा भरली होती. तर यात्रेत भक्ताने नागरिकांनी भरलेल्या १२ बैलगाड्या ओढल्या. या कार्यक्रमासाठी व दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी झाली होती.माळेगाव येथे तुळजापूरच्या कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे ठाण असून देवीच्या मंदिरात नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तर विजयादशमीपर्यंत विविध कार्यक्रम झाले. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी तुळजाभवानी मातेची यात्रा भरली होती. बुधवारी पहाटे तुळजाभवानी मातेच्या मंदिरात भिषेक व अलंकार महापूजा केली. दर्शनासाठी आलेल्या भक्तांची मंदिर परिसरात गर्दी झाली होती.



दुपारी अडीच वाजता १२ बैलगाड्या एकमेकांना दोरखंडाने बांधून त्यात छोटा गाडा ठेवून या १२ बैलगाड्या पाच दिवसापासून मंदिरात उपवास करीत बसलेले भक्त लक्ष्मण लोकरे यांनी ओढल्या. हा सोहळा पाहण्यासाठी बच्चेकंपनीसह महिला, तरुण, नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. तर यात्रेत खाद्यपदार्थांचे, सौंदर्य प्रसाधने व लहान मुलांच्या खेळणीचे स्टॉल लागले होते. रहाट पाळणे व इतर मनोरंजनाच्या साधनांचा आनंद यात्रेकरूंनी घेतला.

## पालक आणि पाल्य यांना कायद्याचे ज्ञान असने ही काळाची गरज-अ‍ॅड. संगीता धसे

बीड प्रतिनिधी

सावरकर प्राथमिक विद्यालय बीड येथे पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर सीमा जोशी तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर, काळे मॅडम, जयश्री नेलवाडकर ताई, देशपांडे ताई आणि शालेय अध्यक्ष एस एम कुलकर्णी सर उपस्थित होते. यावेळी शाळेतील पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदिप जोशी सर यांनी केले , तसेच महिला आणि मुली यांच्यावर वाढत असलेला अत्याचार या अनुषंगने अ‍ॅड संगीता धसे यांनी पालकांनी विद्यार्थ्यांची काळजी कशी घ्यावी जेणेकरून कुठलाही अती प्रसंग लेकराच्या वाट्याला येण्यापूर्वी आपण पाल्यांची काळजी घेतली, त्यांना वेळ दिला, त्यांच्याशी संवाद साधून मैत्रीचे नाते ठेवले तर पाल्य पालकाशी मनमोकळे बोलू शकेल, तनावपूर्ण नात न राहता एक मैत्रीपूर्व नात राहीले तर विद्यार्थी पालकाशी व शिक्षकाशी बोलका होईल, त्याच बरोबर पाल्याला परिस्थितीची जाणीव करून देऊन त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे ध्येर्य निर्माण करावे तसेच मुलांना नकार पचवायची सवय लावावी .., पोक्सो चा कायदा अस्तिवात याच बालकांच्या संरक्षणासाठी आहे त्यामुळे झालाच अन्याय तर शांत न बसता न्यायासाठी दाद मागावी त्यांच्या साठी कायदा व सुव्यवस्था सज्ज आहे या संदर्भात अ‍ॅड संगीता धसे यांनी माहिती दिली, यावेळी अध्यक्षा डॉ सीमा जोशी यांनी मुलांच्या आरोग्या संदर्भात मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुळवेलकर मॅडम व सरांनी केले , यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते रोहिणीताई खाटणकर, राजवनताई, पुराणिकताई उपस्थित होत्या.

## आजपासून होणार फिरती नारळी भावार्थ रामायण कथा

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीरास व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठेस येत्या २२ जानेवारी २०२५ ला एक वर्ष पुर्ण होत आहे. तरी श्री राम मंदीर व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील श्री क्षेत्र महाजनवाडी येथे आजपासून महाराष्ट्रातील प्रथमच फिरता नारळी श्रीएकनाथमहाराजकृत भावार्थ रामायण कथेला प्रारंभ होत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील ५१ गावातील श्री हनुमान मंदीरामध्ये प्रत्येक गावात शनिवार ते शनिवार असा आठ दिवस श्री भावार्थ रामायण कथा सोहळा संपन्न होत असून त्यामुळे प्रत्येक गावागावत भक्तीमय व प्रसन्न वातावरणाची निर्मिती होवून श्रीराम नामाचा गजर होईल.

गेली ५० वर्षापासून श्रीक्षेत्र महाजनवाडी येथे श्री भवार्थ रामायण कथेचे दरवर्षी नियमीत आयोजन करण्यात येते.यंदा मात्र श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीर व प्रभु श्रीरामाच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिनाचे औचित्य साधून श्री भावार्थ रामायण सेवा समितीच्या वतीने फिरता नारळी श्री एकनाथमहाराजकृत भावार्थ रामायण कथेचा शुभारंभ अश्विन कृ.१ शुक्रवार दि.१८ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ठिक ७ वा. श्रीसंतएकनाथ महाराजांचे १४ वे वंशज श्री एकनाथ पदाश्रित ह.भ.प.प.पू योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत श्री हनुमान मंदीर श्री क्षेत्र महाजनवाडी ता.जि.बीड येथे संपन्न होत आहे. तरी बीड जिल्ह्यातील रामायणाचार्य वाचक,सूचक व श्रीमराभक्त मंडळींनी मोठ्या संख्येने या फिरत्या नारळी श्रीएकनाथमहाराकृत भावार्थ रामायण कथेच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहावे. असे आवाहन श्री भावार्थ रामायण सेवा समिती व निमंत्रक विष्णूदासजी महाराज सुरवसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



जालना: न्यु आर्टस्? कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालय अहिल्यानगर (अहमदनगर ) येथे आयोजित कॉम्रेड एकनाथराव भागवत स्मृती करंडक राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत कु. सिध्दी शांतीलाल राऊत हिने महाराष्ट्रातून सांघीक प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल तिचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करतांना भाजपाचे जालना शहराध्यक्ष राजेश राऊत बाजुला अ‍ॅड. दिपक कोल्हे, शांतीलाल राऊत, संजय देठे, प्रा. राजेंद्र भोसले व इतर दिसत आहेत.

# वैद्यकीय क्षेत्र हेच अंतिम ध्येय ठेवू नका :डॉ. उघाडे

बीड/ प्रतिनिधी

आपल्या देशातील बहुतांश हुशार विद्यार्थ्यांचा कल फक्त वैद्यकीय क्षेत्राकडे असल्याचे दिसून येते , साहित्य , अभियांत्रिकी , पत्रकारिता , संशोधन असे अनेक क्षेत्र आहे ज्यामध्ये तुम्ही तुमचे करिअर चांगले करू शकता. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातील बहुतांश हुशारी विद्यार्थी पत्रकारिता आणि संशोधन या क्षेत्राकडे वळतात म्हणूनच अमेरिकेची प्रगती झपाट्याने झाली आहे. आपला सर्वांगीण विकास घडवून आणत असताना देशाचा विकास कसा साध्य होईल याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे .



असे प्रतिपादन विविध स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके लिहिणारे लेखक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी केले. पिंपरगव्हाण रोड , बीड येथील श्री . श्री . रविशंकर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. नंदकुमार उघाडे बोलत होते. पुढे बोलताना डॉ. उघाडे म्हणाले की , शाळा ही एक पवित्र संस्था असते तेथे विद्यार्थ्यांची मने सुसंस्कृत करण्याचे कार्य शिक्षक करत असतात . शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे चारित्र्य चांगले घडते , त्याची क्षमता वाढते आणि त्याच्या आयुष्याला आकार येतो. काहीतरी करून दाखवण्याची महत्वाकांक्षा सदैव आपल्या मनात असली पाहिजे . प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ध्येय , उद्दिष्ट मोठे ठेवून ते मिळवण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे. सतत आपल्या बुद्धीचा विकास करत राहणे हे विद्यार्थ्यांचे ध्येय असावे. इयत्ता आठवी पासूनच योग्य मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वाटचाल ठेवली तर यूपीएससी , एमपीएससी तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये पहिल्याच प्रयत्नात तुम्ही यश मिळवून जिल्हाधिकारी , एसपी , तहसीलदार असे मनाचे व महत्त्वाचे पद मिळवून देशाची सेवा करू शकता. यासाठी अभ्यासातील सातत्य कायम ठेवणे महत्त्वाचे आहे . असेही डॉ. उघाडे म्हणाले. या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या सूर्यवंशी मॅडम यांनी डॉ . नंदकुमार उघाडे यांचा सत्कार केला. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक सुहास सोनवणे यांनी केले.

# आंतरभारतीच्यावतीने शरद लंगे यांना आदर्श कार्यकर्ता पुरस्कार प्रदान

## महात्मा गांधींना संपवण्याचा कट हाणून पाडा-चंद्रकांत झटाले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आंतरभारतीच्या वतीने पत्रकार चंद्रकांत झटाले (अकोला) यांच्या हस्ते शरद लंगे यांना आदर्श कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी आंबाजोगाई आंतरभारतीच्या अध्यक्ष प्रा. डॉ.शैलजा बरुरे,अमर हबीब, दगडू लोमटे,प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे,साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, माणिकराव बावणे,आंतरभारतीच्या उपाध्यक्ष आशा वाघमारे, वैजनाथ शेंगोळे यांची उपस्थिती होती.



चंद्रकांत झटाले यांनी महात्मा गांधी व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील विविध नेत्यांच्या संदर्भातील वास्तव व सद्यस्थितीतील केला जाणारा विपर्यास यावर आपले मत व्यक्त केले. महात्मा गांधींची हत्या झाल्यानंतरही गांधींच्या संदर्भात विविध आक्षेप घेतले जातात. गांधी विचार भारतीय भूमीत रुजलेले बीज असून आता त्याचा वटवृक्ष झाल्याची भावना चंद्रकांत झटाले यांनी व्यक्त केली.महात्मा गांधींकडे संघटन कौशल्य होते. त्याबरोबरच आपल्या विविध रचनात्मक उपक्रमातून भारतीयांना स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा दिली.चंद्रकांत झटाले यांनी, महात्मा गांधी व डॉ.आंबेडकर, महात्मा गांधी व नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या विचार व कार्यातील साम्य स्थळे सांगितली.आदर्श कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त शरद लंगे यांनी आपल्या मनोगतात आपल्या कार्यकर्ता घडण्याची प्रक्रिया व प्रवास सांगितला. विविध सामाजिक, संस्था संघटनांमधून काम करताना आपण कार्यकर्ता म्हणून घडत गेल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आंतरभारतीचे सचिव प्रा संतोष मोहिते यांनी केले.तर शरद लंगे यांचा परिचय मा. अध्यक्ष दत्ता वालेकर यांनी करून दिला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावीर भगरे, वेंकटेश जोशी यांनी प्रयत्न केले.

### जाहिर प्रगटन

**मा. ए.एम.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४३२/२०२४**
**अ‍ॅड. शिरसट एन. के. यांच्या मार्फत**
**प्रतिभा नितीन नाईकवाडे वि. निरंक**

ज्यापेक्षा नितीन चंद्रसेन नाईकवाडे, हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी रा. पांगरबावडी, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार १ प्रतिभा भ्र. नितीन नाईकवाडे, वय-२७ वर्षे, रा. पांगर बावडी, अशोक नगर, बीड ता.जि.बीड सार्थक पि.नितीन नाईकवाडे, वय -०९ वर्षे, रा. पांगर बावडी, अशोक नगर, बीड ता.जि.बीड समृध्दी पि. नितीन नाईकवाडे, वय ०६ वर्षे, रा. पांगर बावडी, अशोक नगर, बीड ता.जि.बीड दैवशाला भ्र.चंदसेन नाईकवाडे, वय-५१ वर्षे, रा. पांगर बावडी, अशोक नगर, बीड ता.जि. बीड अर्जदार क्र १ ही मयत नामे नितीन चंद्रसेन नाईकवाडे, यांची पत्नी असुन, अर्जदार क्र २ व ३ हे मयताचे मुलगा व मुलगी आहेत. अर्जदार क्र ४ ही मयताची आई आहे. तसेच मयताचे वडील हे दि. ०१/०५/२०२१ रोजी मौजे समनापूर, ता. जि. बीड येथे मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयन नितीन चंद्रसेन नाईकवाडे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०६/११/२०२४ आहे.

आज दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

शिक्का

स्वाक्षरित
आदेशावरून
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड

### जाहिर नोटीस

**धारुर येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साहेब यांचे कोर्टात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३००/२०२४**

१.जानकीबाई भ्र. शिवाजी राउत वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. तेलगाव ता. धारूर जि.बीड, २. वचलाबाई भ्र. कुंडलिक धुमाळ वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. तेलगाव ता. धारूर जि.बीड, ३. वेणुबाई भ्र. सुधाकर मुठाळ वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. हासनाबाद ता. धारूर

अर्जदार विरुध्द कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, मयत मथुराबाई भ्र. साहेबराव साखरे यांचे दिनांक ०२.०७.२०२२ रोजी तेलगाव ताःधारूर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. मयत मथुराबाई भ्र. साहेबराव साखरे यांचे पश्चात शासकिय /निमशासकिय व इतर कार्यायीन कामाकरीता अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदार हे मयत मथुराबाई भ्र. साहेबराव साखरे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे याबाबत कुणाचा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे हक्कात वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख ११/१०/२०२४ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला. पुढील तारीखः- २१.११.२०२४

**क. लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क. स्तर धारुर

शिक्का

स्वाक्षरित
**हुकूमावरून**
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर धारुर




# महाराष्ट्रातून परतीच्या पावसानं घेतला निरोप

परतीच्या पावसाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रासह देशातून परतीच्या पावसानं निरोप घेतला आहे. याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. परतीचा पाऊस महाराष्ट्रात प्रवेश करतो-ना-करतो, तोच एका दिवसात तो महाराष्ट्रातून निघूनही गेला आहे. थोडक्यात महाराष्ट्रात परतीचा पाऊस हा केवळ एका दिवसाठीच महाराष्ट्राला स्पर्श करून गेल्याचे खुळे म्हणाले.

परतीचा पाऊस महाराष्ट्राच्या प्रवेशद्वाराजवळच म्हणजे नंदुरबार जिल्ह्यात दिनांक १४ ऑक्टोबरपर्यंत १० दिवस मुक्काम ठोकून होता. मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबरला मात्र, मान्सून (परतीच्या पावसा)ने, महाराष्ट्राबरोबर सीमावर्ती मध्यप्रदेश, दक्षिण छत्तीसगड, पूर्व ओरिसा, तेलंगणा, उत्तर कर्नाटक राज्यातून व संपूर्ण देशातून एका दिवसात निरोप घेतला. म्हणजे परतीचा पाऊस महाराष्ट्रात प्रवेश करतो-ना-करतो, तोच एका दिवसात तो महाराष्ट्रातून निघूनही गेला. थोडक्यात महाराष्ट्रात परतीचा पाऊस हा केवळ एका दिवसाठीच महाराष्ट्राला स्पर्श करून गेला असेच म्हणावे लागेल.



ऑक्टोबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यातील दिनांक २२ ते २६ ऑक्टोबर दरम्यानचे पावसाचे दुसरे आवर्तन त्याच्या नियोजित तारखेऐवजी ६ दिवस अगोदर म्हणजे दिनांक १६ ते २३ ऑक्टोबर दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः खालील २४ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता जाणवते. परंतू, सध्या तिथे सध्या चालु असलेल्या शेतकामासाठी या पावसाची विशेष भीती बाळगू नये, असेही वाटत असल्याचे माणिकराव खुळे म्हणाले. विशेषतः मुंबई शहर उपनगर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर बीड धाराशिव लातूर नांदेड परभणी हिंगोली यवतमाळ वर्धा नागपूर भंडारा गोंदिया गडचिरोली चंद्रपूर ह्या २४ जिल्ह्यात पावसाची शक्यता अधिक जाणवत असल्याचे खुळे म्हणाले.

राज्याच्या काही भागामध्ये ऑक्टोबर हिटचा परिणाम जाणवू लागला आहे. तर काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसत आहेत. राज्यात ढगाळ वातावरण आणि कडक ऊन्हाचा तडाखा असे वातावरण निर्माण झाल्याने दिवसभर कमालीचा उकाडा जाणवत आहे. अशातच राज्यातील काही भागात गेल्या काही दिवसांपासून सतत सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने सर्वत्र एकच दाणादाण उडवली आहे. या परतीच्या पावसामुळं शेती पिकांना मोठा फटका बसला आहे.

## तुरीतील फायटोप्थोरा ब्लाईट रोगाचे नियंत्रण



तूर पीक सध्या फांद्या फुटण्याच्या अवस्थेत आहे. बऱ्याच ठिकाणी सध्या तुरीच्या या अवस्थेतच फायटोप्थोरा ब्लाईट या रोग आलाय. या रोगामुळे तुरीचे पीक करपून जाते. तुरीची मर चार प्रकारच्या बुरशीमुळे होते. त्यापैकी फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या रोगाला फायटोप्थोरा ब्लाईट असं म्हणतात. हा रोग खर तर रोपावस्थेतच येतो पण गेल्या वर्षीपासून मराठवाड्यात काही ठिकाणी हो रोग फाद्या फुटण्याच्या अवस्थेत आणि काही ठिकाणी पिकाच्या शेवटच्या टप्प्यात ही येऊ लागलाय. यो रोगामुळे ४० ते ५० टक्क्यापर्यंत उत्पादनात घट येते. त्यामुळे या रोगाची वेळेवर लक्षणे ओळखण अत्यंत आवश्यक आहे. या रोगाची लक्षणे कशी ओळखायची तर खोडावर गोलाकार टोकाकडे निमुळते होत जाणारे राखेरी रंगाचे चट्टे पडलेले दिसतात. काही दिवसांनी त्या ठिकाणी खाच पडलेली दिसते. खोडाचा भाग फुगतो आणि त्याठिकणी गाठी येतात. प्रादुर्भाव जर जास्त असेल तर गाठीमधून चीकट पदार्थ येऊ लागतो. खोड तपकिरी पडून करपते. फांद्या पण करपतात. अशावेळी पाऊस जर झाला तर या रोगाच प्रमाण वाढतं. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच ताबडतोब उपाय करा.

## उत्पादन वाढीसह किण्वित सेंद्रिय खत

सेंद्रिय खते विकत घेऊन घालणे सर्वच पिकांसाठी शक्य होत नाही. बहुतांश सर्व शेतकरी सेंद्रिय खतांच्या शिफारशीकडे दुर्लक्ष करून रासायनिक खत वापरताना दिसतात. परिणामी जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वेगाने कमी होत गेले आहे. या बाबींचा विचार करून भारत सरकारद्वारे पीएम प्रणाम ही योजना राबवली आहे. त्यामध्ये जमिनीचे आरोग्य व सुपीकता वाढविण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेश यांना पर्यायी खते उदा. सेंद्रिय अथवा जैविक खते यांचा वापर वाढविण्यासाठी अनुदानावर दिली जात आहेत. त्यासाठी कृषी विभागाकडून रासायनिक खत पुरविणाऱ्या मोठ्या खत कंपन्यांना या खतांच्या विक्रीसंदर्भात सूचना दिल्या आहेत. या योजनेअंतर्गत, भारत सरकारने किण्वित सेंद्रिय खतासाठी (एफओएम) साठी प्रति टन रुपये पंधराशे इतकी रक्कम बाजार विकास सहकार्यासाठी पुरवठादार किंवा उत्पादकांना देऊ केली आहे.

किण्वित सेंद्रिय खत (एफओएम) म्हणजे काय? : वनस्पती अथवा प्राण्यांचे अवशेष हवारहित स्थितीमध्ये कुजवून आंबविल्यानंतर तयार होणाऱ्या खतांना किण्वित सेंद्रिय खत (एफओएम) असे म्हणतात. या आंबविण्याच्या प्रक्रियेमध्ये ईस्ट, लाईम, लॅक्टिक ॲसिड बॅक्टेरिया आणि विविध प्रकारच्या सुमारे ८० सूक्ष्मजिवांच्या प्रजातींचे मिश्रण केले जाते.



एफओएमचे विशेष फायदे : मातीशास्त्र व कृषी रसायनशास्त्र कृषी संस्था, नैनी आणि सॅम हिंगिनबोटम तंत्रज्ञान व शास्त्र कृषी विद्यापीठ, प्रयागराज, उत्तर प्रदेश यांनी संयुक्तपणे हिरवा वाटाणा या पिकासाठी मातीमध्ये एफओएम आणि मायकोऱ्हायजा यांचा वापर करून प्रयोग केले. त्यामुळे मातीवर होणाऱ्या भौतिक व रासायनिक परिणामांचा अभ्यास करून काही नोंदी नोंदवल्या. त्यानुसार जमिनीची सच्छिद्रता ४४.६८% वरून ५२.८१ टक्क्यापर्यंत (म्हणजेच ८.१९%) वाढली. जलधारण क्षमता ४३.५२% वरून ४८.५३% (म्हणजेच पाच टक्के) इतकी वाढली. या खतांच्या वापरामुळे जमिनीतील जिवाणूंची गुणवत्ता व संख्या वाढते. ते जमिनीतील अन्नद्रव्याचे खनिजांमध्ये रूपांतर करतात. ते जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे विघटन होऊन त्यांची साधी संयुगे तयार होतात. ती पिकांकडून सहजपणे शोषली जातात. पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते व पीक निरोगी राहते. मिथेन अथवा कार्बन डाय-ऑक्साइड सारखे हरितगृह वायू कमी होत असल्यामुळे पर्यावरण पूरक आहे. जैविक खतांच्या उपलब्धतेमुळे रासायनिक खताची मात्रा निश्चितच कमी करता येते. पीक उत्पादनाचा दर्जा व चव सुधारते. हे खत १००% सेंद्रिय असून, पिकाच्या गरजेनुसार अन्नद्रव्याची उपलब्धता केली जाते. रासायनिक खतामध्ये बचत झाल्यास त्याच्या आयातीसाठी खर्च होणारे परकीय चलन वाचू शकेल. यामुळे पिकांची व्यवस्थित वाढ होते. त्याबरोबर जमिनीतील कार्बन, नत्र गुणोत्तर सुद्धा सुधारते. शेणखताच्या तुलनेमध्ये टाकण्याची मजुरी, वाहतूक खर्च कमी राहतो. शेणखतातून गवताचे बी शेतात जाऊन वाढणारी तणांची समस्या टाळता येते.

## हुरड्यासाठी ज्वारी लागवडीचे तंत्र

हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो, कारण त्यावेळेला या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ल, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते. खास हुरडयासाठी गोडसर रसाळ आणि भरपूर दाणे असणाऱ्या जाती राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ ,राहुरी यांनी विकसित केलेल्या जाती :

१) फुले मधुर (आर एस एस जी व्ही -४६) - उत्कृष्ट प्रतीचा व चवदार हुरडा. खोड मध्यम,गोड ,रसरशीत. वाण उंच व पालेदार जात. हुरडा अवस्था येण्यास ९३ ते ९८ दिवस लागतात. हुरडा अवस्थेत दाणे सहज सुटण्याचे प्रमाण हे ९५ टक्के पेक्षा जास्त. खोडमाशी किडीस ,खडखड्या रोगास प्रतिकारक, अवर्षणास प्रतिकारक, हुरड्याचे उत्पादन ३०-३५ क्विं./हे.- कडब्याचे उत्पादन ६५ ते ७० क्विं./ हेक्टरी: फुले उत्तरा : स्थानिक जातीतून निवड पद्धतीने विकसित. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात.सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड. ताटे गोड असल्याने जनावरे कडबा चवीने खातात. कणीस गोलाकार,मध्यम घट्ट मध्यम उंचीचा,पाने पालेदार खोड मध्यम ,गोड रसरशीत. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. हुरडा उत्पादन : २०-२५ क्विंटल प्रती हेक्टरी. कडब्याचे उत्पादन : ५५ते ६० क्विंटल प्रती हेक्टरी.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ ,परभणीएसजीएस ८-४ : हुरडा रुचकर आणि गोड. हुरडयाची प्रत उत्तम. कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात. इतर हुरड्याच्या जातीपेक्षा याचा दाना टपोरा. हुरडा उत्पादन १५-१६ क्विंटल प्रती हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ७०-७५ क्विंटल प्रती हेक्टरी. परभणी वसंत (पीव्हीआरएसजी १०१) : खाण्यास चवदार,गोड,मऊ कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात. हुरड्याची अवस्था येण्यास ९५ दिवस. खोडमाशी ,खोड कीड व खडखड्या रोगास सहनशील. दाण्याची आणि कडब्याची प्रत उत्तम. हुरडा उत्पादन ३४ क्विंटल प्रती हेक्टर. कडब्याचे उत्पादन १३३-१३५ क्विंटल प्रती हेक्टरी. मराठवाडा विभागासाठी शिफारस



पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला ट्रॉम्बे अकोला सुरुची (टी ए के पी एस -५) : मळणीस अतिशय सुलभ हुरडयाची प्रत उत्तम, चवदार हुरडा तयार होण्याचा कालावधी ९१ दिवस, हुरडयाचे उत्पादन ४३ क्विंटल. हिरवा चारा उत्पादन ११० क्विंटल. महाराष्ट्रासाठी प्रसारित.

स्थानिक जाती: सुरती,गूळभेंडी, कुची कुची,काळी दगडी, वाणी, मालदांडी-

लागवडीचे तंत्र : मध्यम ते भारी, पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. पेरणीपूर्वी जमिनीची नांगरट केल्यास जमिनीत पाणी मुरण्यास मदत होते. जमिनीची बांध बंदिस्ती करावी. सारा यंत्राने वाफे पाडून त्यामध्ये बळिराम नांगराने बांधणी करावी. त्यामुळे परतीच्या पावसाचे पाणी पूर्णपणे वाफ्यात साचून जमिनीत मुरण्यास मदत होते. १५ ऑक्टोबरपर्यंत पेरणी पूर्ण करावी. खोड माशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आणि भरपूर उत्पादन मिळण्यासाठी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी करावी. आर्थिक फायद्यासाठी टप्प्या टप्प्याने लागवड करावी. दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी आणि दोन रोपात १५ सेंमी अंतर ठेवावे. पेरणीकरिता हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक चोळावे.त्यानंतर २५ ग्रॅम प्रत्येकी ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम पीएसबी या जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. मध्यम जमिनीत पेरणी करताना प्रति हेक्टरी ४० किलो नत्र आणि २० किलो स्फुरद म्हणजेच ८७ किलो युरिया आणि १२५ किलो एसएसपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. भारी जमिनीत पेरणी करताना प्रति हेक्टरी ६० किलो नत्र आणि ३० किलो स्फुरद म्हणजेच १३० किलो युरिया आणि १८७ किलो एसएसपी द्यावे. बागायती ज्वारीसाठी, मध्यम व खोल जमिनीसाठी जमिनीकरिता प्रति हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश म्हणजेच १७४ किलो युरिया, २५० किलो एसएसपी आणि ६७ किलो एमओपी याप्रमाणे खते द्यावीत. बागायती ज्वारीच्या पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद,पालाश व अर्धे नत्र द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी पहिली खुरपणी झाल्यावर साधारणपणे द्यावे. भारी जमिनीत प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. त्याकरिता २१७ किलो युरिया, ३०८ किलो एसएसपी आणि ८४ किलो एमओपी द्यावे. पेरणी करतेवेळी संपूर्ण स्फुरद,पालाश व अर्धे नत्र द्यावे.उर्वरित नत्र साधारणपणे पेरणीनंतर एक महिन्यांनी पहिली खुरपणी झाल्यावर द्यावे.

कोरडवाहू रब्बी ज्वारीस पेरणीच्या वेळी ५०:२५:२५ नत्र:स्फुरद:पालाश प्रति हेक्टरी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. ज्वारीची उगवण झाल्यावर १० ते १२ दिवसांनी विरळणी करावी.पिकाच्या सुरवातीच्या ३५ ते ४० दिवसात पीक ताणविरहित ठेवावे. पेरणीनंतर आवश्यकतेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी आणि तीन वेळा कोळपणी करावी. पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी फटीच्या कोळप्याने करावी. दुसरी कोळपणी पेरणीनंतर पाच आठवड्यांनी पासेच्या कोळप्याने करावी.त्यामुळे रोपांना मातीचा आधार मिळतो. तिसरी कोळपणी आठ आठवड्यांनी दातेरी कोळप्याने करावी.त्यामुळे जमिनीच्या भेगा बुजवण्यास मदत होऊन जमिनीतील ओल्याव्याचे बाष्पीभवन न होता जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते. कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३०दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे. दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत ज्वारीला पाणी द्यावे. बागायती ज्वारीस मध्यम जमिनीत तिसरे पाणी फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी द्यावे. अंगठा आणि बोटाच्या मध्ये ज्वारीचा दाणा दाबून पाहिल्यास दुधासारखा द्रव किंचित बाहेर येतो. दाणे मऊसर लागतात. झाड फुलोऱ्यात आल्यानंतर १५ ते २५ दिवसांत ही अवस्था येते. या टप्प्यावर दाण्यामध्ये स्टार्च वेगाने साचत असते. या अवस्थेत एकूण धान्य वजनाच्या ५० टक्के एवढे असते. पुढे हुरड्याच्या अवस्थेत दाण्यामध्ये ते प्रमाण ६५ ते ६८ टक्के एवढे असते. हुरडा अवस्थेमधील कणसे आणल्यानंतर कणसे खुडून ती हाताने चोळावीत.. हाताने चोळल्यानंतर त्यामधील दाणे सहज वेगळे होऊ शकतात. हुरडा ४ अंश सेल्सिअस तापमानात साठवल्यास ३० दिवसांपर्यंत चांगला राहू शकतो.

जमिनीच्या प्रकारानुसार रासायनिक खतांचा वापर : रासायनिक खतांचे हेक्टरी प्रमाण-जमिनीची प्रकार-कोरडवाहू-बागायती नत्र(युरिया)-स्फुरद(एसएसपी)-पालाश(एमओपी)-नत्र(युरिया)-स्फुरद(एसएसपी)-पालाश(एमओपी) मध्यम(४५-६० सेंमी)-४०(८७)-२०(१२५)-८०(१७४)-४०(२५०)-४०(६७) भारी(६० पेक्षा जास्त )-६०(१३०)-३०(१८८)-१००(२१७)-५०(३१३)-५०(८४) टीप : नत्र दोन हफ्त्यात (पेरणीवेळी अर्धे व पेरणीनंतर एक महिन्याने अर्धे),संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळेस द्यावे. कोरडवाहू जमिनीस संपूर्ण नत्र,स्फुरद व पालाश ( ५०:२५:२५ किलो/हेक्टरी) दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावे.




### महत्वाच्या घटना

१२१६ : इंग्लंडचा राजा जॉन मृत्यूमुखी पडल्यामुळे त्याचा ९ वर्षाचा मुलगा हेन्री हा राजेपदी आरुढ झाला.
१७८१ : ब्रिटिश जनरल कॉर्नविलास अमेरिकेला शरण गेले, यामुळे अमेरिकन क्रांती युद्ध संपले.
१८१२ : नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोच्या सीमेवरुन माघार घेतली.
१८५३ : अमेरिकतील हवाना येथे जगातील पहिली पिठाची गिरणी सुरु करण्यात आली.
१९३३ : जर्मनी लीग ऑफ नेशन्स मधून बाहेर पडले.
१९३५ : इथिओपियावर आक्रमण केल्यामुळे राष्ट्रसंघाने इटलीवर आर्थिक निर्बंध घातले.
१९४४ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजा फिलीपाइन्सला पोचल्या.
१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द
१९९३ : पुण्याजवळील महारेडिओ दुर्बिण प्रकल्पाचे जनक आणि शास्त्रज्ञ प्रा. गोविंद स्वरुप यांना सर सी. व्ही. रामन पदक जाहीर
१९९४ : रुद्रवीणावादक उस्ताद असद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' जाहीर.
२००० : पार्श्वगायिका आशा भोसले यांना राज्यशासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान
२००५ : मानवतेविरुद्ध गुन्ह्यांसाठी सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध खटला सुरू झाला.
२०१९ : सैनिकी शाळेत मुलींनाही प्रवेश मिळण्याच्या प्रस्तावाला स्वरक्षण मंत्री यांची मंजुरी मिळाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०२ : दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण कथालेखक. 'किशोरीचे हृदय', 'विद्या आणि वारुणी' ही कादंबरी, 'तोड ही माळ' हे नाटक व अनेक कथासंग्रह त्यांनी लिहीले. (मृत्यू: ३१ मे १९७३ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९१० : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय- अमेरिकन खगोल वैज्ञानिक. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९९५)
१९२० : पांडुरंगशास्त्री आठवले कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदि शास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २५ आक्टोबर २००३)
१९२५ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (मृत्यू: १७ एप्रिल २००१)
१९२९ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित गांधीवादी विचारधारी भारतीय समाजसेविका निर्मला देशपांडे यांचा जन्मदिन.
१९३६ : शांताराम नांदगावकर गीतकार (मृत्यू: ११ जुलै २००९)
१९५४ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १९ सप्टेंबर २००२)
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, राजकारणी आणि पंजाब राज्यातील गुरदासपूर येथील विद्यमान संसद सदस्य अजयसिंग देओल उर्फ सनी देओल यांचा जन्मदिन.
१९६१ : अजय सिंग देओल ऊर्फ 'सनी देओल' अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१६ : जॉन इंग्लंडचा राजा (जन्म: २४ डिसेंबर ११६६)
१७४५ : आयर्लंड देशातील निबंधकार, कवी, आणि व्यंगचित्रकार जोनाथन स्विफ्ट यांचे निधन.
१९३४ : विश्वनाथ कार ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक. १८९६ मधे त्यांनी एक छापखाना काढून 'उत्कल साहित्य' नावाचे सर्वस्वी साहित्याला वाहिलेले दर्जेदार नियतकालिक सुरू केले. (जन्म: २४ डिसेंबर १८६४)
१९३७ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ३० ऑगस्ट १८७१)
१९५० : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८८७)
१९८६ : मोझांबिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३३)
१९९५ : बाल कलाकार म्हणून पुढे आलेल्या व नंतर सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या सलमा बेग ऊर्फ 'बेबी नाझ' यांचे निधन. (जन्म:)
२००३ : बोत्सिया व हर्जेगोविना देशाचे पहिले अध्यक्ष अलिजा इझेटबेगोविच यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा मार्ग मोकळा

## जुन्या व नवीन बसस्थानकांची जागा राज्य परिवहन महामंडळाकडुन नगर परिषदेला हस्तांतरित

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील जुन्या बसस्थानकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे व नवीन बसस्थानकात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक होण्याचा मार्ग मोकळा झाला असुन या दोन्ही महामानवाच्या स्मारकासाठी राज्य परीवहान महामंडळाने जागा उपलब्ध करण्यासाठी मंजुरी दिली असुन याबाबत राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक बीड यांनी दोन्ही स्मारकासाठी दि १४ ऑक्टोबर रोजीच्या आदेशानुसार सदर जागा नगर परिषदेला हस्तांतरित केली आहे.

माजलगाव शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक जुन्या बसस्थानक येथे व्हावे व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक नवीन बसस्थानकात उभारण्यात यावी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज प्रेमी नागरिकांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती.त्यानुसार या दोन्ही महामानवाच्या स्मारकासाठी जुन्या व नवीन बसस्थानकातील जागेची मागणी करण्यात आली होती.परंतु राज्य परिवहन महामंडळाने




सदर जागा नगर परिषदेला हस्तांतरित करण्यासाठी मंजुरी दिली नव्हती परंतु राज्य परिवहन महामंडळाने दि १४ ऑक्टोबर रोजी दोन्ही महापुरुषांचा स्मारकासाठी जागा देण्यास मंजुरी देऊन सदर जागा नगरपरिषदेल हस्तांतरित करण्यात आली आहे.राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रक बीड यांनी दिलेल्या आदेशात असे नमूद केले आहे की,दि. ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ३०४ व्या बैठकीत वरील विषयाबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.राज्य परिवहन महामंडळाचा ठराव क्रं.२ मधील ठरावानुसार शहरातील जुन्या बसस्थानकाच्या सर्व्हे क्रं.३७५ येथे १० फुट बाय १० फुट जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी व नविन बसस्थानकाच्या सर्व्हे.नं २४० येथे १० फुट बाय १० फुट या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारणे संबंधीच्या प्रस्तावास रा.प. महामंडळाच्या ठरावात मंजूरी दिली आहे.त्यामुळे माजलगाव येथील जुन्या बसस्थानकामध्ये १० फुट बाय १० फुट जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी व नवीन बसस्थानकामध्ये १० फुट बाय १० फुट या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यासाठी रा.प. महामंडळामार्फत जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे.त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाकडुन सदर जागा हस्तांतरित करण्याचे आदेश नगर परिषदेच्या मुख्यधिकारी यांना देण्यात आल्याने आता दोन्ही महापुरुषांच्या स्मारक होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी



बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र कपिलधार येथे प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त कपिलधार देवस्थानच्या वतीने शि.भ.प. उमाकांत आप्पा मिटकरी यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. या कोजागिरी पौर्णिमेला १११ लिटर दुधाच्या प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच यावेळी कीर्तनकार महाराजांनी श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामीनी जो मार्ग दाखविला तो शुद्ध अंतकरणाने, निस्वार्थ केलल कर्म, व भक्तीसेवा ही मानव समाजाला उच्च स्थानी घेऊन जाते . संताने दाखविलेल्या भक्ती मार्गाने समाज प्रबोधन होते.असे महाराजानी आपल्या शिव कीर्तनात सांगितले.

तसेच रात्री हाडोंग्री भजनी मंडळ, तमलूर भजनी मंडळ ,मासिक पौर्णिमा भजनी मंडळ बीड तसेच चिंचोली भजनी मंडळ, मन्मथ भजनी मंडळ कळब यांनी कार्यकार्यक्रमास उपस्थित लावली. तसेच यावेळी कार्यक्रमास उपस्थित पूजेचे यजमान नागेश आप्पा मिटकरी बीड, मन्मथ स्वामी देवस्थान पुजारी विश्वनाथ स्वामी आप्पा (कपिलधार), वैजनाथ दगडू शिंदे महाराज दत्त संस्थान (कपिलधारवाडी), शंकर स्वामी जायफळकर, मन्मथ स्वामी देवस्थानचे विश्वस्त अश्रुबा रसाळ, शिवशंकर आप्पा भुरे, झांबरे आबा, अशोक शहागडकर, श्रीकांत मिटकरी, सुशील रसाळ, सोमनाथ रसाळ, डॉ. त्रिंबक स्वामी, नाना शिंगणापूर, अविनाश तोडकर, डॉ. वलांडे, हलकुडे आप्पा, दिनेश राजमाने आदी उपस्थित होते.

## || थोडक्यात

### सायकलिंग स्पर्धेसाठी रुद्र पाखरे पात्र

बीड: महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे द्वारा आयोजित केल्यानंतर शालेय विभागीय सायकलिंग स्पर्धेत बीड जिल्ह्यातील गोमळवाडा तालुका शिरूर येथील मूळ रहिवाशी रुद्र पाशा कल्याण पाखरे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे आता तो राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे

विभागीय सायकलिंग स्पर्धा अमरावती येथे दिनांक १४ ऑक्टोबर रोजी संपन्न झाल्या रुद्र पाखरे यांच्या या यशाबद्दल त्याचे गंगाधर पाखरे भगवान तांदळे सुनंदा पाखरे मंडोदरी तांदळे श्रीकांत पाखरे राणी पाखरे हलका खाडे संभाजी खाडे यशवंत तांदळे वसंत तांदळे माधुरी तांदळे राजश्री तांदळे यांनी अभिनंदन केले असून पुढील स्पर्धेला शुभेच्छा दिल्या आहेत

### शिरापूर धुमाळ येथे दिवसा घरफोडी

बीड: कुटुंब शेतात काम करत असल्याची संधी साधून चोरट्यांनी एका शेतकऱ्याच्या घराचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश करत सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लांब पास केले ही घटना १४ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली आज्ञाता विरुद्ध पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

शिवसेना रामकिसन बहिर वय ४२ राहणार शिरापूर धुमाळ तालुका शिरूर यांनी याबाबत फिर्याद नोंदवली १४ ऑक्टोबर रोजी ते घराला कुलूप लावून शेतात काम करण्यासाठी गेले होते यादरम्यान चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला नंतर कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण दोन लाख ७९ हजार पाचशे रुपयांचा ऐवज सोडून नेला घरी परतल्यानंतर शिवसेना बहिर यांना चोरी झाल्याचे लक्षात आले त्यानंतर त्यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद नोंदवली याप्रकरणी आज्ञाता विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस अधिक तपास करत आहेत भर दिवसा घडलेल्या चोरीच्या घटनेमुळे परिसरात भीती निर्माण झाली.

### विनापरवानगी मोर्चा काढल्या प्रकरणी गुन्हा

बीड: येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विनापरवानगी आचारसंहितेच्या कालावधीत आंदोलन केल्याप्रकरणी दीडशे ते २०० महिला पुरुष आणि विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे १६ ऑक्टोबर रोजी दुपारी पावणे एक ते अडीच वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर किसान सभेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता दरम्यान सदरील आंदोलनाला प्रशासनाने परवानगी नाकारलेली असतानाही जाणीवपूर्वक जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करून घोषणा दिल्याप्रकरणी तसेच आंदोलनात ध्वनिक्षेपक उपलब्ध करून दिल्याप्रकरणी हे कोण दीडशे ते २०० जणांवर युद्ध पोलिसांमलदार भागवत घोडके यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला

### दुचाकीची चोरी

दिंद्रुड : येथून जवळच असलेल्या भोपा शिवारातील निर्मळ पेट्रोल पंपालगतच्या रस्त्यावर चोरट्यांनी ५० हजार रुपये किमतीची एक दुचाकी क्रमांक एम एच तेवीस बीके ३७ ३९ ही चोरून नेली ही घटना १४ ऑक्टोबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली दीपक सदाशिव बंडेकर राहणार सेलू तालुका गेवराई यांच्या फिर्यादीवरून आत्म्याचा विरुद्ध पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला पोलीस अधिक तपास करत आहे

# पाटोदा वन क्षेत्रामध्ये वन्यजीवन सप्ताह उत्साहात




पिंपळवंडी। प्रतिनिधी

वन परिक्षेत्र कार्यालय पाटोदा अंतर्गत वन्यजीवन सप्ताहात विविध उपक्रम राबवून सप्ताह साजरा करण्यात आला.बीड विभागीय वनाधिकारी अमोल गर्कळ व पाटोदा वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा वन क्षेत्रामध्ये वन्यजीवन सप्ताह साजरा केला. सप्ताहमध्ये शालेय विद्यार्थ्यांना शाळेत वन्यजीवन सप्ताहाचे महत्त्व पटवून देण्यात येऊन सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.तसेच या निमित्त निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले.वन्यजीवन सप्ताहाची सांगता शिरूर तालुक्यातील तागडगाव येथील सर्पज्ञानी प्रकल्प येथे करण्यात आला.तसेच या ठिकाणी श्रीमती सृष्टीताई सिद्धार्थ सोनवणे यांच्या उपस्थितीमध्ये सराटी पक्षी निसर्ग अधिवासामध्ये सोडवण्यात आला व सप्ताह सोहळा निसर्गरम्य वातावरणात साजरा करून वन्यजीवन सप्ताह यशस्वी करण्यासाठी ए.ए.देवगुडे वनपाल पाटोदा तसेच वनरक्षक एन.के.काकडे,एस.आर.राठोड,जी.बी.सानप,राजेश जोशी व वनमजूर सोपान येवले,रामेश्वर बेद्रे,शेख सत्तार, शिवाजी आघाव,सातपुते,विजय जाधव,शहादेव पवार,सतीश गर्जे,भिमराव सव्वाशे,शामराव देवकर,पांडुरंग दानवले,दिलीप शहाणे,शेख बशीर आदींनी परिश्रम घेतले.

# वाचन ही सर्वश्रेष्ठ प्रेरणा शक्ती -डॉ. हनुमंत सौदागर

## युसूफवडगाव हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा



केज। प्रतिनिधी

प्रत्येक मनुष्याचे आयुष्य घडविण्यात वाचनाची आवड हेच महत्त्वाचे कारण ठरले आहे. वाचनाशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय महान कार्याची सिद्धता नाही. महापुरुषांकडे वाचन हेच सर्वश्रेष्ठ प्रेरणा शक्ती होती असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.भारतरत्न डॉ एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती म्हणजेच वाचन प्रेरणा दिनानिमित्त ते पैठण येथील वडगाव हायस्कूल वडगाव भाग शाळा येथे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्धन चौधरी, प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक अनंत तरकसबंद यांची होती पुढे बोलतांना ते म्हणाले भारतरत्न डॉ कलाम यांचा निस्वार्थीपणा, संशोधन वृत्ती सामाजिकिता असे महान विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत विद्यार्थ्यांनी आवडीनुसार वाचन करावे. चांगले वाईट यामधील फरक समजून घ्यावा. पर्यावरणाचे संवर्धन करावे शिक्षणातून चांगला माणूस घडायला हवा असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंत तरकसबंद यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक श्री इंगळे श्री धायगुडे यांनी परिश्रम घेतले आभार श्री इंगळे यांनी मानले

# मुक्कामी बस बंद असल्याने प्रवाशांचे हाल

## दोन्ही बस सुरु न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-पांढरवाडी फाटा तसेच पाथर्डी-शेवगाव मार्गे जामखेड-पैठण तसेच,जामखेड-शिरूर मुक्कामी बस पूर्ववत सुरू करावी अशी मागणी प्रवाशांनी एसटी आगार प्रमुख यांना निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे, जामखेड आगारातून गेल्या पन्नास वर्षापासून कुसळंब-पिंपळवंडी- अंमळनेर-जाटनांदुर मार्गे जामखेड येथून दुपारी साडेचार वाजता जामखेड ते शिरूर मुक्कामी बस सुरू केली होती. परंतु,कोरोनाच्या आजारात बस सेवा बंद झाल्या.त्या कोरोनाच्या काळात ही बस बंद करण्यात आली.ती पुन्हा सुरू करण्यात आलीच नाही.अनेक वर्षांपासून सुरू असलेली बस सेवा बंद करून जामखेड आगार प्रमुखांनी या परिसरातील सर्व स्तरातील प्रवाशांवर अन्याय करून एक प्रकारची हेडसांड चालवलेली आहे.



याबरोबरच जामखेड ते पैठण जाणारी बस बंद करून पिंपळवंडी- अंमळनेर-कोतन-पांढरवाडी फाटा परिसरातील प्रवाशांना आगारप्रमुखांनी वार्यावर सोडल्याच्या नाराजीच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. पिंपळवंडी-अंमळनेर-कोतन- पांढरवाडी फाटा परिसरातील प्रवाशांना या मार्गावरून जामखेड येथे जा-ये करण्यासाठी एकही बस नसल्याने विद्यार्थी,प्रवाशी,महिला ज्येष्ठांची खूपच कुचुंबना व हेळसांड होत आहे.बस नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे.त्यामुळे आर्थिक भुर्दंडाबरोबर अनियमित वेळेत प्रवास करावा लागत आहे. याची आगार प्रमुखांनी दखल घेऊन येणार्या दिवाळी सणाचा हंगाम लक्षात घेऊन दोन्हीही बससेवा त्वरित सुरू कराव्यात अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशारा प्रवाशी नागरिकांनी दिला आहे.

# धारूरमध्ये प्रवाशांनी केली कंडक्टरला मारहाण

केज । प्रतिनिधी

रस्त्यात बस थांबविण्यासाठी घंटी वाजवून कंडक्टरला खाली ओढून दोघा पती पत्नीने मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणला. या प्रकरणी वाहकाच्या तक्रारी वरून मारहाण करणाऱ्या पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १५ ऑक्टोबर रोजी धारूर आगाराची धारूर-माजलगाव गाडीचे कंडक्टर शहादेव मंत्री आणि त्यांचे सोबत ड्रायव्हर श्रीकांत ठोंबरे हे सकाळी १०:४५ वा. धारूर बस स्थानकाच्या बाहेर घेवुन जात असताना गाडीत बसलेला प्रवाशी बन्सी रामकिसन चौरे याने बसची बेल वाजविली; म्हणून कंडक्टर मंत्री त्याला म्हणाले, तुम्ही बेल वाजवु नका. मी बस रोडच्या बाजुला थांबवितो. असे म्हणताच बन्सी चौरे याने चालु बसचा दरवाजा उघडला व म्हणाला की, तुम्ही बस थांबावा. त्यामुळे ड्रायव्हर ठोंबरे यांनी तेलगांव रोडवर एस बी आय बँक समोर रोडच्या बाजुला बस थांबविली. बस थांबताच बन्सी चौरे याने कंडक्टर मंत्री यांना बसमधून खाली ओढून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्या नंतर त्याची पत्नी संगीता चौरे खाली उतरली आणि तिनेही कंडक्टरचे कपडे फाडुन चप्पलने मारहाण केली. तर बन्सी चौरे याने उजव्या हाताचा अंगठा धरुन मुरगळाला. ते दोघे पती-पत्नी भर रस्यात्यातर कंडक्टर मंत्री याला रस्त्यावर मारीत असतानाच्या घटनेचा व्हिडिओ उपलब्ध असून त्यांनी सरकारी कामात अडथळा निर्माण करून मारहाण केली आहे.या प्रकरणी कंडक्टर मंत्री यांच्या तक्रारी वरून बन्सी चौरे व त्याची पत्नी संगीता चौरे या दोघांच्या विरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण करून कर्तव्यावर असलेल्या कंडक्टरला मारहाण केल्या प्रकरणी गु. र. नं. २९९/२०२४ भा. न्या. सं. १३२, १२१(१), ११५(२),३५२ आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धारूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल अशोक गवळी हे पुढील तपास करीत आहेत.

# आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुखपदी महादेव आवाड यांची निवड

वडवणी । प्रतिनिधी

आज दि.१०-१०-२०२४ रोजी वडवणी येथे आझाद क्रांती सेनेच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.हि बैठक आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.या बैठकीमध्ये आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुख म्हणून चळवळीतील अनुभवी महादेव आवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.सर्व बहुजनांना सोबत घेऊन तालुक्यातील शेतकरी,शोषीत,पिडीत,कष्टकरी,शेतमजुर, कामगार, विद्यार्थी,कलाकार,यांचे प्रश्न शासन दरबारी मांडुन न्याय देण्याचा प्रयत्न आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातुन करणार आसल्याचे यावेळी महादेव आवाड यांनी सांगितले.यावेळी आझाद क्रांती सेनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे, माजी सरपंच सुभाष साळवे, माजी सरपंच आरुण आवाड,ॲड सचिन आवचर, भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे, लक्ष्मण आवाड, उसतोड कामगार सनेचे ता प्रमुख सतीश हाणवते,धारुर ता प्रमुख बळीराम मस्के,उद्योजक केरबा कसबे, लक्ष्मण पाटोळे,आकाश हाणवते,वामण निवे, श्रीराम हाणवते, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ तांबडे,धारुर उपाध्यक्ष चंद्रसेन मस्के,कैलास गायकवाड़ राहूल गायकवाड़,पांडूदादा नानवर,करण मस्के, बाबासाहेब पाटोळे, यांच्या सह तालुक्यातील चाहत्यांनी महादेव आवाड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.



### अध्यक्ष पदाला गालबोट लागु देणार नाही

आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी माझ्यावर वडवणी ता प्रमुख पदाची जी जबाबदारी सोपवण्यात आली त्या पदाला गालबोट लागु देणार नाही आशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

# सिद्धेश्वर महाविद्यालयात ईव्हीएम मशीन हाताळणी प्रशिक्षण शिबिर



माजलगाव। प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयांमध्ये आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने' चुनाव की पाठशाला 'या उपक्रमांतर्गत ईव्हीएम हाताळणी प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीच्या या उत्सवामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूकांना खूप महत्त्व आहे. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवं मतदारांची जनजागृती व्हावी व त्यांच्यावरील ईव्हीएम मशीन हाताळण्याचे दडपण दूर व्हावे या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. ईव्हीएम हाताळणी संदर्भाची संपूर्ण माहिती प्रा. नागेश पटवी यांनी विद्यार्थ्यांना दिली तसेच यावेळेस विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदान करण्याचा अनुभव घेतला. शिबीर प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, प्रा अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

# साथीच्या आजारात वाढ, दवाखान्यात गर्दी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**वातावरणातील बदलामुळे लहान मुलांची, वृद्धांची प्रकृती वरचेवर बिघडत असून त्यांना सर्दी,ताप, खोकला अशा प्रकारच्या आजारात वाढ होताना दिसत आहे.**

शहराच्या विविध भागातील लहान मुले, वृद्ध माणसे यांना विविध आजाराची लागण होत असून त्यांच्या रक्ताची चाचणी केली असता त्यांना व्हायरल फिवर आजार सांगितल्या जात आहे वृद्धा सह तरुण मुले लहान बालके यांचाही मोठ्या समावेश प्रमाणात समावेश आहे. अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात थंडीताप, पेशी कमी होणे व तत्सम आजाराचे रुग्ण वाढल्याचे दिसत आहेत सध्याची स्थिती लक्षात घेता अधून-मधून पडणारा पाऊस, वातावरणातील बदल, पावसामुळे येणारे दूषित पाणी, परिसरातील अस्वच्छता या सर्व बाबींचा परिणाम या आजारात आहेअसे जरी असले तरी सर्दी, ताप,खोकला,मलेरिया व श्वसन विकारासह इतर आजारांची चाचणी होत आहे सध्या या जीवघेण्या आजाराचे मोठ्या प्रमाणावर थैमान आहे. सर्वच वयोगटातील नागरिकांनाआजाराने घेरले आहे अनेकांना आजाराबाबत गंभीरता वाटत असल्याने ते तात्काळ उपचार घेत आहेत. विविध भागातील घाणीच्या साम्राज्यामुळे डेंग्यु व इतर आजाराच्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे विशेष म्हणजे शहराच्या जुन्या भागात रिपरिप पावसामुळे मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्यामुळे यातून अनेक प्रकारच्या डासांची निर्मिती होत असून त्यामुळेच साथीच्या आजारांची लागण वाढली आहे अनेक रुग्ण उपचारार्थ दाखल होत आहेत. शिवाय बसस्थानक,मंदिरे आणि गर्दीची ठिकाणे या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असते त्यामुळे तिथेही आजाराची लागण होत आहे.





बीडः ना.धनंजय मुंडे हे एका कार्यक्रमानिमित्त आळंदी देवाची येथे आले असता, त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

## निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून आदेश निर्गमित

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.

सदरील आदेश प्रत्येकावर तामील करणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिस विभागाने जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, सदरील आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहतील, असेही निर्गमित आदेशांमध्ये नमूद आहे. वेगवेगळ्या आदेशात पुढील बाबी नमूद आहेत. शासकीय, निमशासकीय परिसर जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि विश्रामगृहांच्या आवारात कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाजाचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणुकीसंबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, किंवा कार्यालयीन आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इ.बाबी नियंत्रित करणे या कृती करण्यास निर्बंध घालण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग, बॅनर्स, पोस्टर्स, व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपित करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पान २ वर

## महात्मा गांधी सेवाभाव व समर्पित जीवनाचे आदर्श-चंद्रकांत झटाले

### स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई येथे गांधी जयंतीनिमित्त व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय परिसरातील महात्मा फुले वसतीगृहात दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी माननीय चंद्रकांत झटाले, पत्रकार ,अकोला यांचे व्याख्यान संपन्न झाले. महात्मा गांधी जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत आयोजित केलेल्या या व्याख्याना चंद्रकांत झटाले यांनी महात्मा गांधी यांनी आपले संपूर्ण जीवन दुर्बल यांच्या सेवेसाठी समर्पित केल्याचे सांगितले.भारतीय स्वातंत्र्यलढा सर्वसामान्यांपर्यंत नेण्यांमध्ये महात्मा गांधींचे मोठे योगदान असल्याचे म्हटले. अनेक शतके पारतंत्र्यात राहिलेल्या सामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महात्मा गांधींनी आपले जीवन समर्पित केले. सर्वसामान्य लोकांना सत्ता केंद्रात आणले. महात्मा गांधींच्या संदर्भातील विविध समज- गैरसमजावरही व्याख्यात्यांनी भाष्य केले व सर्व गैरसमजांचे खंडन केले.



या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. कमलाकरराव चौसाळकर, उपाध्यक्ष श्री. गणपत व्यास गुरुजी, सहसचिव प्राचार्य भीमाशंकर शेटे सर, सहसचिव प्रा. एन. के. गोळेगावकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. पान २ वर

## वयाच्या ८५ व्या वर्षी रंगुबाई बोडखे यांची अध्यात्मनिष्ठा कायम!

### कोजागिरीनिमित्त माहेरच्या भोन्याई देवीची मन:पूर्वक केली पूजा

**आष्टी । प्रतिनिधी**

**वयाच्या ८५ व्या.वर्षीसुद्धा आणि विशेष म्हणजे दोन महिन्यापुर्वी अत्यंत क्रिटिकल शस्त्रक्रिया होऊ नये प्रचंड अध्यात्म निष्ठेच्या जोरावर कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने माहेरच्या आष्टी या गावी देवीची मन:पूर्वक पूजा करून समाधान मानणाऱ्या श्रीमती रंगुबाई लक्ष्मणराव बोडखे यांच्या अध्यात्म निष्ठेविषयी विशेष कौतुकाने पाहिले जात आहेत.**



महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे येथील शहर गाव वाड्यावर त्यासह तांड्यावर अत्यंत पवित्र भावनेने अध्यात्मक दृष्टिकोनातून विविध देवदेवतांची मनोभावे पूजा केली जाते. केवळ निष्ठेमुळे इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो. महिला वर्गातून परमार्थ भक्तीची ओढ अधिक दिसून येते.बीड जिल्ह्याच्या आष्टी येथील जेष्ठ पत्रकार तथा झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या आई श्रीमती रंगुबाई लक्ष्मणराव बोडखे या ८५ वर्षाच्या आहेत. त्यांची दोन महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया पार पडली. सर्वांच्या आशीर्वादाने त्या सध्या आनंदी जीवन जगत आहेत.अनेकांनी शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रत्यक्ष बोडखे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन पान २ वर

## 'समृद्धी'च्या सभासदांची दिवाळी होणार गोड

### १०० रुपये वाढीव हप्त्याची घोषणा-चेअरमन घाटगे



> कपाशी, सोयाबीन या पिकाचे अतिवृष्टीत नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून हातात पैसा आला नाही. आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी समृद्धीने १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय घेतला. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल.
>
> **-सतीश घाटगे, चेअरमन, समृद्धी शुगर्स**

**अंबड । प्रतनिधी**

समृद्धी साखर कारखान्याच्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगाम २०२३-२४ मधील गाळप झालेल्या उसाचा पहिला २८०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे देण्यात आला. आता दिवाळी सणानिमित्त कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी १०० रुपये प्रती मे टन प्रमाणे वाढीव हप्ता देण्याची घोषणा केली आहे.हा वाढीव हप्ता दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहे. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी मंगळवारी (दि.१७) दिली आहे.

शेतकऱ्यांच्या उसाला समृद्धी कारखाना उच्चांकी भाव देत असल्याने शेतकरी आनंदी आहेत. उच्चांकी भावाची परंपरा यंदाही 'समृद्धी'ने कायम ठेवली असून पहिला हप्ता २ हजार ८०० रुपये प्रतीटन प्रमाणे दिल्यानंतर दिवाळी सणासाठी १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय सतीश घाटगे यांनी जाहीर केला आहे.

## काकू-नाना प्रतिष्ठानला गोरगरिबांच्या आरोग्य सेवेचे आशीर्वाद



**बीड । पतिनिधी**

**लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले महाआरोग्य शिबिर गावा-गावातील गोरगरिबांच्या आरोग्याची सेवा निरंतर करत आहे. प्रामुख्याने या शिबिराचा फायदा वृद्धांना होताना दिसून येत आहे.**

बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी वांगी येथे मोफत सामुदायिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास वांगी येथील गावकर्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जवळपास ११५ रुग्णांनी आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून होमिओपॅथीची औषधी घेतली. आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव पान २ वर

## गंगा माऊलीचे बॉयलर शुभारंभ

### कर्मचाऱ्यांना एक पगार बोनस तर डिसेंबर नंतर पगारवाढ

**केज । प्रतिनिधी**

**तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विश्वास पात्र असलेल्या गंगा माऊली शुगर या कारखान्याचे गुरुवारी दि.१७ रोजी बॉयलर अग्नी प्रतीपदन सोहळा पार पडला यावेळी सुरू होणारा हंगाम देखील किमान ५ लाख उसाचे गाळप होणार असा विश्वास कारखान्याचे संचालक प्रविण मोरे यांनी बोलताना व्यक्त केला. तर कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांच्या सूचनेनुसार दिवाळीचा बोनस म्हणून कर्मचाऱ्याला एक पगार जादा तर येत्या डिसेंबर नंतर कर्मचाऱ्याच्या पगारात देखील वाढ करण्याचा मानस असल्याचे कारखान्याचे कार्यकारी संचालक प्रविण मोरे यांनी सांगितले.**




गंगा माऊली शुगर च्या तृतीय गळीत हंगामाचा बॉयलर आज हभप भगवान महाराज, हभप हरिहर महाराज दिवेगावकर, हभप उद्धव बापू आपेगावकर यांच्या शुभ हस्ते तर माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, गंगा माऊली शुगरचे व्हा. चेअरमन हनुमंत काका मोरे, संचालक पान २ वर

## अंबाजोगाई कृ.उ.बा.समितीचे सभापती अॅड.राजेश्वर चव्हाण यांचा सत्कार

# सर्व संचालक मंडळांनी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे मानले आभार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे साहेब यांनी अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीला लागून असलेली वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत अंबाजोगाई जिल्हा बीड येथील सर्वे नंबर ५९९ मधील जमीन कृषी उत्पन्न बाजार समितीला विनामूल्य हस्तांतरित केल्याबद्दल महाराष्ट्राचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ऍड राजेश्वर आबा चव्हाण व सर्व संचालक मंडळ यांनी विशेष आभार मानले असून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब यांचा जाहीर नागरी सत्कार करण्याचे आयोजन करण्यात आले होते परंतु आचारसंहिता लागल्यामुळे सत्कार सोहळा कार्यक्रम निवडणूक आचारसंहिता संपल्या नंतर करण्याचे ठरवले आहे .**



अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती लगट असलेली जमीन मिळवण्यासाठी सभापती अॅड राजेश्वर आबा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सर्व संचालक मंडळाने गेल्या सहा महिन्यापासून सातत्याने पाठपुरावा केला निवडणूक आचारसंहिता लागण्या अगोदरच पाठपुराव्याला यश मिळाले म्हणून कोजागिरी पौर्णिमा निमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातच विद्यमान संचालक मंडळ व बाजार समितीचे सर्व कर्मचारी यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार पक्षाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अॅड.राजेश्वर आबा चव्हाण उपसभापती लक्ष्मण कर्नल यांचा सत्कार करण्यात आला व मिठाई वाटप करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. सत्कारमूर्ती एडवोकेट राजेश्वर आबा चव्हाण प्रसार माध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले शेतकरी व्यापारी हमाल मापाडी यांनी आपल्याला निवडून दिलेल्या ऋणातून मुक्त होण्याकरिता आमचा हा प्रयत्न या प्रयत्नाला यश आल्यामुळे आज ही जमीन मिळाली मिळालेल्या जमिनीचा उपयोग शेतकऱ्यांच्या मालाला योग्य प्रमाणे भाव त्यांच्या व्यवहारातील पारदर्शकता कशी टिकेल याकडे पान २ वर

## नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी

बीड । प्रतिनिधी

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे. शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने आचारसंहिता कालावधीत सदरील शस्त्रे जमा करावीत. तसेच आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करण्याची कार्यवाही पोलिस विभागाने करावी. यामध्ये बँक, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र व इतर महत्त्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून सदरील शस्त्रांबाबत कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नवीन ३२ गावांतील करवसुली थांबवा

## ग्रामस्थांना दिलासा मात्र कोट्यावधींचा कर बूडणार

पुणे । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्य शासनाने महापालिकेत २०१७ पासून समाविष्ट झालेल्या नवीन ३२ गावांमधील मिळकतकर आकारणी करण्यास स्थगिती दिली आहे. त्याचबरोबर या गावांसाठी महापालिकेकडून लावण्यात आलेल्या मिळकतकर आकारणीचे पुनर्विलोकन करावे आणि हा कर ही गावे ग्रामपंचायतीत असताना त्या वेळी झालेल्या करआकारणीच्या दुप्पट दराने आकारणी करावी. असे आदेश दिले आहेत.**

हा निर्णय होईपर्यंत या समाविष्ट गावांमधून कोणतीही करवसुली करू नये, अशा स्पष्ट सूचना महापालिकेस दिल्या आहेत. परिणामी महापालिकेस मोठा आर्थिक फटका बसणार असून, कर आकारणीवरून जुनी हद्द आणि नवीन हद्द



### ४०० कोटींचा महसूल बुडणार

महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये एकूण ४ लाख ३७ हजार ३४५ मिळकती आहेत. महापालिकेने केलेल्या कर आकारणीनुसार या मिळकतींना २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी पालिकेने सुमारे ५९५ कोटी रुपयांची बिले पाठविली आहेत. त्यामुळे या गावांमधून महापालिकेस ६०० कोटींचा महसूल मिळणार होता. मात्र, आता शासनाच्या आदेशानुसार ग्रामंपचायतीच्या नियमानुसार करआकारणी केल्यास पालिकेची मागणी थेट ४०० कोटींनी कमी होऊन २०० कोटींवर येणार आहे. त्यामुळे महापालिकेस ४०० कोटींच्या महसुलावर पाणी सोडावे लागणार आहे.

या नव्या वादाला तोंड फुटणार आहे. शासनाकडून लोकसभा निवडणुकीपूर्वी या गावांमधील शास्तीकर वसुलीस स्थगिती दिली होती. या स्थगितीबाबत निर्णय झालेला नसतानाच आता शासनाने सरसकट करवसुलीलाच स्थगिती दिल्याने महापालिकेचे आर्थिक नियोजन कोलमडण्याची भीती आहे. महापालिकेत २०१७ मध्ये ११ गावे समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर २०२१ मध्ये आणखी २३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर महापालिकेकडून या सर्व गावांमध्ये महापालिकेनजीकच्या मिळकतीच्या दरानुसार करआकारणी सुरू केली आहे. मात्र, या मिळकतींना महापालिका आकारत असलेला कर ग्रामपंचायतीच्या करापेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने या गावांमधील नागरिकांनी शासनाकडे मागणी करून मिळकतकर रद्द करण्याची मागणी केली होती. त्यात उरूळी देवाची आणि फुरसुंगी या दोन्ही गावांचाही समावेश होता. मात्र, शासनाने आता ही दोन गावे वगळून नवीन नगरपरिषद केल्याने आता ३२ गावांमधील करवसुलीस स्थगिती दिली आहे.

# मानकरांना रुपाली चाकणकरांचे सडेतोड उत्तर

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीत अंतर्गत वाद उफाळला

पुणे । प्रतिनिधी

**राज्यामध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. अजित पवार गटाची जोरदार तयारी सुरु आहे. मात्र काही नेत्यांमध्ये नाराजीनाट्य सुरु असल्याचे दिसून आले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर हे नाराज असल्याचे उघड झाले आहे. त्यांनी शनिवारी (दि.१९) राजीनामा देणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांना पुण्यामध्ये धक्का बसला आहे. दीपक मानकर यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला आहे. आता रुपाली चाकणकर यांनी देखील सडेतोड उत्तर दिले आहे.**





अजित पवार यांच्या पक्षाचे नेते दीपक मानकर यांनी पक्षाने संधी न दिल्यामुळे नाराजी व्यक्त केली. अजित पवार गटातील दोन नेत्यांना विधान परिषदेच्या आमदारकीची संधी देण्यात आली. मात्र शब्द देऊन देखील मानकर यांना संधी न दिल्यामुळे त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला असून शपथ घेतलेल्या नेत्यांवर देखील रोष व्यक्त केला. छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज भुजबळ यांना संधी देण्यात आली. तसेच रुपाली चाकणकर यांना पुन्हा एकदा महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संधी देण्यात आली म्हणून नाराजी व्यक्त केली. दीपक मानकर म्हणाले की, ''आम्हाला का संधी मिळाली नाही, रुपाली चाकणकरांनाच सातत्याने संधी का मिळते, त्या कार्यकर्तीला तुम्ही ताकद देता, २४ तास तुमच्यासोबत असतात म्हणून त्यांचीच बाजू तुम्ही घेणार का, आम्हाला का नाही विचारणार. सुनील तटकरे यांनी एवढी तत्परता आमच्यासाठी देखील दाखवावी,'' अशा शब्दांत दीपक मानकर यांनी आपली नाराजी उघड केली होती. दीपक मानकर यांच्या टीकेवर रुपाली चाकणकर यांनी उत्तर दिले आहे. चाकणकर म्हणाल्या की, 'मानकर यांना शहराध्यक्षपद देताना मी भगिनी म्हणून मानकर यांच्या पाठीशी उभी होते. पण, त्याने अस का केलं मला माहिती नाही,' असे मत रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केले आहे. पुढे रुपाली चाकणकर म्हणाल्या की, ''राज्यपाल नियुक्त आमदारांच्या कोट्यात जर तीन जागा आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला आल्या असत्या, तर महिला म्हणून मला आमदारकी मिळाली असती. परंतु, दोनच जागा आम्हाला मिळाल्या, पुढच्या वेळी माझा विचार केला जाईल, मला अपेक्षा होती आणि मी मागणी देखील केली होती. पण, महायुती सरकारचे आभार मानते, मला परत एकदा महिला आयोगाचे अध्यक्षपद देण्यात आले, असे मत रुपाली चाकणकर यांनी म्हटले आहे.

# मंत्री तानाजी सावंतांच्या सुरक्षारक्षकाच्या घरी 'मिस फायर'; १३ वर्षीय मुलगा जखमी

पुणे । प्रतिनिधी

**निवृत्त लष्करी जवानाने कपाटात ठेवलेल्या रिव्हॉल्वरला धक्का लागल्याने झालेल्या गोळीबारात १३ वर्षीय शाळकरी मुलगा जखमी झाला. धनकवडीतील वनराई कॉलनी भागात ही घटना घडली. याप्रकरणी जवानाविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ते मंत्री तानाजी सावंत यांच्या घरी सुरक्षारक्षक म्हणून नोकरीस आहेत.**

अभय नितीन शिर्के (वय १३) असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचे वडील निवृत्त जवान नितीन हनुमंत शिर्के (वय ४०, रा. श्री गणेश अपार्टमेंट, वनराई कॉलनी, धनकवडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलीस हवालदार हेमंत राऊत यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नितीन शिर्के



लष्करातून निवृत्त झाले आहेत. सध्या ते सुरक्षा अधिकारी म्हणून काम करतात. शिर्के यांच्याकडे शस्त्र परवाना आहे. त्यांनी रिव्हॉल्वर कपाटातील एका पिशवीत ठेवली होती. रिव्हॉल्वरमध्ये गोळ्या भरलेल्या होत्या. शिर्के यांचा मुलगा अभय एका शाळेत सातवीत आहे. मंगळवारी दुपारी तो घरात होता. दुपारी सव्वातीनच्या सुमारास अभयने कपाट उघडले. रिव्हॉल्वर ठेवलेल्या पिशवीला धक्का लागला. पिशवी जमीनीवर पडली. रिव्हॉल्वरचा चापावर दाब पडला आणि गोळीबार झाला. रिव्हॉल्वरमधून सुटलेली एक गोळी अभयच्या पायातून आरपार गेली. त्यावेळी अभयची आई आणि लहान भाऊ घरात होते. गोळीबाराची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, मुलाचे वडील निवृत्त जवान नितीन शिर्के यांच्या बेजबाबदारपणामुळे दुर्घटना घडल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक सागर पाटील तपास करत आहेत.

# अजित पवारांनी अमोल मिटकरींना आवरावं...!

## बारामती, इंदापूरात काम न करण्याचा भाजप युवा मोर्चाचा इशारा

बारामती । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार अमोल मिटकरींना आवरावे नाहीतर आम्ही इंदापूर आणि बारामतीमध्ये राष्ट्रवादीचे काम करणार नाही अशी भूमिका भाजप युवा मोर्चाने घेतली आहे. अमोल मिटकरी यांनी गोपीचंद पडळकर यांच्यावरती टीका केली होती. यावरुन आता भाजपा आक्रमक झाली आहे.**

अजित पवारांनी अमोल मिटकरी यांना आवर घालावी अन्यथा आम्ही बारामती आणि इंदापूर विधानसभेत राष्ट्रवादीचे महायुती म्हणून काम करणार नाही अशी भूमिका भाजपा कार्यकर्त्यांनी घेतली आहे. याबाबत युवा मोर्चाचे वैभव सोलनकर यांनी इशारा दिला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी भाजपचं बारामतीतील आव्हान मोडीत काढलं होतं. भाजपने बारामतीतून अजित पवार यांच्याविरोधात गोपीचंद पडळकर यांना उतरवलं होतं. मात्र, अजित पवारांनी गोपीचंद पडळकर यांच्यासह उर्वरित सर्वच उमेदवारांचा दारुण पराभव केला. पडळकरांसह सर्वच उमेदवारोंचे अगदी डिपॉझिट देखील जप्त केले होते. अशी टीका मिटकरींनी त्यांच्यावर टीका केली होती. यावरुन भाजप युवा मोर्चा आक्रमक झाला आहे.

# सरन्यायाधीश डॉ.चंद्रचूड रविवारी कनेरसरला

खेड । प्रतिनिधी

**भारताचे विद्यमान सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड रविवारी (दि. २०) खेड तालुक्यातील कनेरसर या त्यांच्या मूळ गावी भेट देणार आहेत. दि. १० नोव्हेंबर रोजी चंद्रचूड हे सरन्यायाधीशपदावरून निवृत्त होणार आहेत.**



कनेरसर येथील ग्रामस्थांच्या वतीने त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते अशोक टाव्हरे, सरपंच सुनीताताई केदारी, दिलीपराव माशेरे यांनी सांगितले. सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांचे वडील दिवंगत यशवंतराव चंद्रचूड हे १९७८ ते १९८५ अशी सात वर्षे भारताचे सरन्यायाधीश होते. सर्वाधिक कालावधी त्यांना लाभला होता. यशवंतराव चंद्रचूड यांचे वडील विष्णू चंद्रचूड हे १९१२ साली एलएलबी परीक्षेत राज्यात प्रथम आले होते. यशवंतराव चंद्रचूड हे १९४२ मध्ये व त्यांची मुलगी १९७१ मध्ये एलएलबी परीक्षेत राज्यात प्रथम आले होते. चंद्रचूड घराण्याची आगळीवेगळी 'हॅट्ट्रिक' झाली होती. न्या. डॉ. धनंजय चंद्रचूड यांची दि. २९ मार्च २००० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली. ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी त्यांची पदोन्नती झाली. दि. १३ मे २०१६ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली. दि. ९ नोव्हेंबर २०२२ मध्ये सेवाज्येष्ठतेनुसार भारताच्या सरन्यायाधीशपदाची न्या. धनंजय चंद्रचूड यांनी शपथ घेतली. रामजन्मभूमी खटल्यातील घटनापीठात त्यांचा समावेश होता. त्याबाबतचा ऐतिहासिक निकाल खंडपीठाने दिला होता. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना चौथीची बोर्ड परीक्षा रद्द करण्याचा क्रांतिकारी निर्णय न्या.धनंजय चंद्रचूड यांनी दिला होता. देशातील अनेक महत्त्वपूर्ण खटल्यांमध्ये सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांचे योगदान आहे. न्या. भगवती पिता-पुत्रांनंतर सरन्यायाधीशपदी नियुक्त होणारी भारतातील दुसरी न्या. चंद्रचूड पिता-पुत्रांची जोडी आहे. यशवंतराव चंद्रचूड हेसुद्धा सरन्यायाधीश असताना १९८५ साली कनेरसरला आले होते. त्याचप्रमाणे स्वतः सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड हे कनेरसर गावाला भेट देत असल्याने आठवणींना उजाळा मिळाल्याचे अशोक टाव्हरे यांनी सांगितले.

# लैंगिक अत्याचार प्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा

पिंपरी । प्रतिनिधी

**तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगून पतीने त्याचे चित्रीकरण केले. याप्रकरणी पतीसह चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना पुनावळे येथे घडली.**



याबाबत ३० वर्षीय पत्नीने बुधवारी (दि. १६) रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पतीसह चार जणांच्या विरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सप्टेंबर २०२३ ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत पुनावळे येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पती याने तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी आपल्या पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगितले. तसेच या अत्याचाराचे अश्लिल चित्रफित तयार केली. ती चित्रफित व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच पतीने पत्नीसोबत अनैसर्गिक कृत्यही केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पत्नीने यास विरोध केला असता तिला शिवीगाळ केली. रावेत पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# शाळेतील कर्मचाऱ्याने केला तीन विद्यार्थिनींचा विनयभंग

पिंपरी । प्रतिनिधी

**शाळेतील ॲडमिन ऑफिसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने तीन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केला. याप्रकरणी शाळेतील मुख्याध्यापकाने दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

सरफराज मन्सुर शेख (वय ३२, रा. अकबर रेसिडन्सी, कोंढवा, पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिकेने याबाबत नव्याने सुरू झालेल्या दापोडी (भोसरी) पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना ऑगस्ट २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत घडली. शाळेतील १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीने शाळेच्या मुख्याध्यापकाला सांगितले की आरोपी सरफरात याच्या शरिराला वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्श करीत बॅड टच केला. तसेच शाळेतील १५ वर्षीय मुलीलाही आरोपीने बॅडटच केल्याचे सांगितले. अन्य एका मुलीचा शाळेपासून तिच्या घरापर्यंत पाठलाग केला. दापोडी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## उच्च न्यायालय, खंडपीठांची दोन दिवसीय विशेष लोकअदालत

पुणे । प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालय तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या लोकअदालतीसाठी पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी (ऑनलाईन) पद्धतीने सहभागी होऊ शकतात असेही त्यांनी कळविले आहे. या विशेष लोक अदालतीत मुंबई उच्च न्यायालय, नागपुर व औरंगाबाद खंडपीठ येथे प्रलंबित असलेले खटले पुणे विधी सेवा प्राधिकरण येथून ऑनलाईन पद्धतीने तडजोडीने मिटविण्याची संधी प्राधिकरणाने उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची प्रकरणे येथे प्रलंबित आहे व ती तडजोडीने मिटवावीत, अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनी संबंधीत वकीलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहिती साठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी केले आहे.

# पोलीस कारवाईची भीती दाखवत तरूणाला लुटले; तब्बल २३ लाखांना घातला गंडा

पुणे । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांमध्ये पुणे शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना देखील सातत्याने घडत आहेत. काही दिवसांपूर्वी वानवडी येथे शाळेतील एका लहान मुलीवर स्कूल व्हॅनमध्ये अत्याचाराची घटना घडली. त्यातच पुण्यातील बोपदेव घाटात फिरायला गेलेल्या एक मुलीवर सामूहिक अत्याचाराची घटना घडली आहे. कोयता गँग, हीट अँड रन प्रकरण असे गुन्हे पुण्यात सातत्याने घडताना दिसत आहेत. दरम्यान आता सायबर चोरट्यांनी तरुणाची २३ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.**

मनी लाँड्रिंग व्यवहारात तुमचे नाव आले असून, दिल्ली पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी तरुणाची २३ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी



एका ३८ वर्षीय तरुणाने चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानूसार, सायबर चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी खासगी कंपनीत नोकरी करतो. सायबर चोरट्यांनी त्याला मोबाईलद्वारे गेल्या महिन्यात (दि. २१ सप्टेंबर) संपर्क साधला. मनी लाँड्रिंगच्या अनधिकृत व्यवहारात तुमचे नाव आले आहे. त्यामुळे तुमच्याविरुद्ध दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तुमच्या बँक खात्याचा या पैशांच्या व्यवहारात वापर झाला असून, या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे जमा करावे लागतील, असे सांगितले. तरुण पोलीस कारवाईच्या भिती पोटी प्रचंड घाबरला. त्यामुळे त्याने सायबर चोरट्यांनी सांगितल्यानूसार संबंधित बँक खात्यात वेळोवेळी पैसे जमा केले. २३ लाख ५५ हजार रुपये जमा केले. तरीही चोरटे आणखी पैसे जमा करण्यास सांगत होते. तेव्हा तरुणाला गडबड असल्याचा संशय आला. त्याने माहिती घेतल्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात आले. वरिष्ठ निरीक्षक अनिल माने तपास करत आहेत.

# पत्नीचे उत्पन्न अधिक असल्याने पोटगी देण्यास नकार; कौटुंबिक न्यायालयाचा महत्वपुर्ण निकाल

पुणे । प्रतिनिधी

**पत्नीचे उत्पन्न पतीपेक्षा अधिक असल्याने तिने केलेला पोटगीसाठीचा अर्ज कौटुंबिक न्यायालयाने फेटाळला. पत्नीने दिलेल्या शपथपत्राच्या आधारे तिला दरमहा एक लाख ११ हजार ८५० रुपये वेतन आहे. तसेच पत्नीने उपचारांबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत, असे नमूद करत न्यायाधीश एस. एन. रुक्मे यांनी अर्ज फेटाळला.**

विवाहानंतर ११ महिने संसार केल्यानंतर पत्नी २०१६ मध्ये घर सोडून गेली होती. पत्नी परत न आल्याने पतीने




'स्पेशल मॅरेज ॲक्ट'नुसार चार वर्षांहून अधिक काळ विभक्त राहत असल्याचे कारण देत ॲड. कल्पना निकम यांच्यामार्फत घटस्फोटासाठी दावा दाखल केला. त्यानंतर पत्नीने अंतरिम पोटगीसाठी अर्ज केला होता. पती जिम ट्रेनर आहे. तसेच त्याचे कॅफे आहे. त्याचे सुमारे ८० हजार रुपये मासिक उत्पन्न आहे. तर माझे मासिक उत्पन्न ६८ हजार रुपये आहे. हे पतीपेक्षा कमी आहे. मी आजारी असते. उपचार घ्यावे लागत असल्याने पोटगी मिळावी, असे पत्नीने दाखल केलेल्या अर्जात नमूद आहे. या अर्जास ॲड. निकम यांनी विरोध केला. पतीचे मासिक उत्पन्न ८० हजार रुपये असल्याचे पत्नीचे म्हणणे आहे. मात्र, त्याचा कागदोपत्री पुरावा नाही, असा युक्तिवाद ॲड. निकम यांनी केला. पत्नीने तिचे उत्पन्न ६८ हजार ८२३ रुपये असल्याचे नमूद केले होते. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पती-पत्नीने संपत्ती, उत्पन्नाचे स्रोत याची माहिती शपथपत्राद्वारे न्यायालयात देणे बंधनकारक आहे. यात दिलेल्या माहितीनुसार पत्नीला फेब्रुवारी २०२४ महिन्यात एक लाख ११ हजार ८५० रुपये वेतन आहे. त्यातील ८४ हजार ८६७ रुपये हातात येत असल्याचे दिसून आले. तसेच ती आजारी असल्याचे म्हणत आहे. मात्र, तिने याबाबत कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत, असे निकालात नमूद आहे.